## प्रकरण चौथे

# 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' लेखनाचे विशेष

# प्रकरण चौथे

## 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' लेखनाचे विशेष

- **प्रास्ताविक**
- गोमंतकीय लेखक परंपरा
- 'आज इथे उद्या तिथे' : आख्यायिका / दंतकथा
- 'देखणी दक्षिण' : आख्यायिका / दंतकथा
- आज इथे उद्या तिथे : स्थलवर्णन / शहरांचे विशेष
- देखणी दक्षिण : स्थलवर्णन / शहरांचे विशेष
- 'आज इथे उद्या तिथे' मधील रुढी, परंपरा, अंधश्रध्दा
- देखणी दक्षिण मधील सण व उत्सव
- देखणी दक्षिण मधील जीवनभाष्य
- प्रवास हाच अनुभवाचा घटक
- वास्तव हेच अनुभव विश्व
- निरीक्षणशक्तीची कसोटी
- प्रदेशाचे जिवंतचित्र
- पारदर्शकता
- प्रगल्भता

- लेखिकेचे प्रतिभावान मन
- आत्मपरीक्षण
- आत्मचरित्राला जवळीक साधणारे लेखन
- लेखकाचे व्यक्तिमत्व
- समारोप

# प्रकरण चौथे

## 'आज इथे उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' – लेखनाचे विशेष

अव्वल इंग्रजी कालखंडापासून ते आजपर्यंत 'प्रवासवर्णने' हा ललित साहित्याचा वाङ्.मय प्रकार दुर्लक्षितच आहे. मराठीतील पहिली प्रवासवर्णन लिहिणारी स्त्री म्हणून पंडिता रमाबाईंचा उल्लेख करावा लागेल. त्यांचे 'इंग्लंडचा प्रवास' (१८८३) व युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवृत्त (१८८९) ही दोन लक्षणीय प्रवासवृत्ते होत. प्रवासवर्णन लिहिणाऱ्या स्त्री आहेत त्या पुढीलप्रमाणे. सौ. पार्वतीबाई चिटणवीस यांचे 'आमचा जगाचा प्रवास' (१९१५), यमुनाबाई गोखले यांचे 'प्रवास यात्रावर्णन' (१९२६), इंदूमती जाधव यांचे 'आमचा पाचगणीचा प्रवास' (१९३६), सरोजिनी देशपांडे यांचे डायरी, पत्रे व लेख अशी तिहेरी वीण असलेले 'युरोपच्या अंतरंगात (१९४२), उमाबाई चापेकर यांचे अभंगपर 'श्री मुक्तिनाथ यात्रावर्णन', आनंदीबाई जयवंत यांचे 'चितोड' अनूसयाबाई कामत यांचे 'आमची विलायतेला प्रथम भेट' (१९५१), कमला फडके यांचे 'आमची त्रिवेंद्रमची सफर' (१९४७), सौ. मेघा काळे यांची अलीकडील प्रवासवर्णने इ. प्रसिध्द प्रवासवृत्ते व 'स्त्री' आदी मासिकांतून आलेले प्रवासवर्णनपर लेख इ. स्त्रियांनी प्रवासाच्या बाबतीत केलेल्या वर्णनांचा आपल्याला उल्लेख करावा लागेल.

भालचंद्र फडके म्हणतात, ''प्रवासवर्णनातून 'मी' ची अनेक रूपे 'मी' ची चिंतनशिलता सौंदर्यासक्ती इ. चे मनोज्ञदर्शन घडायला हवे.''[१] प्रवासवर्णन लिहित असताना लेखिकेने त्यांच्या स्वत:च्या व्यक्तित्वाचीही छाप दाखवून दिली पाहिजे.

**गोमंतकीय लेखक परंपरा स्वरूप :**

केशव सद्रेंचे विवेचन, ''जन्माने गोमंतकीय असलेल्या लोकांनी गोव्यातच राहून निर्माण केलेले मराठी साहित्य उदा. सुखटणकर, कारे, प्रियोळकर, धर्मानंद, बा. भ. बोरकर, शंकर रामाणी, नरेंद्र बोडके इ. चे साहित्य मराठीतच साहित्य निर्मिती करणे ही गोष्ट या बहूतेक सर्वांना नैसर्गिक गोष्ट वाटली. कुणी क्वचित कोकणीकडे वळले, पण त्यांची ख्याती मराठी साहित्यासाठीच सर्वदूर पोचली.

जन्माने गोमंतकीय असलेल्या लोकांनी गोव्याबाहेर जाऊन लिहिलेले साहित्य : यात पुन्हा दोन प्रकार आहेत. (अ) गोमंतकीय जीवन चित्रण करणारे साहित्य उदा. सुभाष भेंड्यांची जोगीण, आमचे गोंय अमकां पाय इ. (ब) गोमंतकीय प्रादेशिक वैशिष्ट्यांच्या पलीकडे जाऊन लेखकांना जाणवलेले जीवन चित्रित करणारे साहित्य उदा. सुभाष भेंड्यांची अंधारवाटा, वि. ज. बोरकरांची जिराफ इ. (क) गोमंतकीयेतरांनी गोव्यात राहून गोमंतकीय प्रदेश संदर्भाशिवाय लिहिलेले मराठी साहित्य उदा. नरेश कवडी, मुरलीधर कुलकर्णी, प्रल्हाद वडेर, यशवंत कर्णिक यांचे साहित्य वर उल्लेखलेल्या गटांतील अनेक लेखकांचे साहित्य मराठीत सरूवातीला 'प्रादेशिक साहित्य' म्हणनच ओळखले गेले.'' [२] तसेच गोमंतकीय मराठी साहित्यातील प्रवासवर्णने परंपरा म्हणून गो. ना. माडगावर, महादेव शास्त्री जोशी, सुभाष भेंडे, रवींद्र केळेकर इ. चा उल्लेख करावा लागेल.

केशव सद्रेंच्या मते, ''गोमंतकीयामधील एका मोठ्या समाजाने साहित्यनिर्मितीसाठी वा कोणत्याही लेखनासाठी सातत्याने पुस्तकी मराठी व व्यवहारात बोलण्यासाठी कोकणीचा वापर केला आहे.'' [३]

**आज इथे उद्या तिथे मधील आख्यायिका / दंतकथा :**

समाजामध्ये ज्या दंतकथा असतात त्या परंपरेने लोकांमधून मौखिक स्वरूपात चालत आलेल्या असतात. आख्यायिका दंतकथा यामागे काहीतरी गुढ दडलेले असते. ते उलगडून पाहिले तर बऱ्याच गोष्टीवर प्रकाश पडतो. त्या संदर्भात वा. ल. कुलकर्णी यांचे मत विचारात घेऊ.

''दंतकथा ही कथाच खरी; तिचा उगम केव्हा तरी प्रत्यक्षातच झालेला असतो, एके काळी जो इतिहास होता. अगदी पुराव्याने सिध्द होणारा इतिहास होता. त्यातूनच ती जन्मलेली असते, परंतु आता आपण तिच्याशी संबंध असलेला हा इतिहास विसरलेलो असो. तिचे मूळ वास्तविक कोठल्यातरी निश्चित आचारात, समजुतीत, समाजव्यवहारात किंवा सृष्टीव्यवहारात असते. परंतु तिचे मूळ कशात आहे हा विचारही आता तिच्या बाबतीत आपल्या मनाला शिवत नाही. हे घटनेतील म्हणजे इतिहासातील शाश्वत तेवढे पकडण्याची आणि टिकवण्याची शक्ती साहित्यात असते''[४] अशा दंतकथामधून समाजाला एक मार्गदर्शन म्हणून त्या काम करत असतात. समाजातील वेगवेगळ्या घटकावर त्या अप्रत्यक्ष रूपकाच्या माध्यमातून भाष्य करीत असतात.

आपल्याकडील प्राचीन जे पुराण, ग्रंथ आहेत त्यामध्ये अशा दंतकथा, आख्यायिकांचे प्रमाण खूपच आहे. बऱ्याच कथांमधून समाजप्रबोधनही साधले जाते, तर काही कथांमधून प्राचीन संस्कृती, प्राचीन समाज, त्यांचा व्यवहार, चालीरिती, रूढी यावर प्रकाश पडतो. त्याच गोष्टी मार्गदर्शकही ठरू शकतात. प्राचीन, घटना, प्रसंग, वास्तूकला, शिल्पकला यावरही प्रकाश पडू शकतो. दंतकथांतून तसे खोदकाम व संशोधनही झाले व जे गुढ, गुपीत दडले आहे ते बाहेर आले असून वर्तमानातील ज्या घटना, प्रसंग, सण, उत्सव,

समारंभ आहे यांच्याशी त्यांचा काही संबंध आहे का हे संशोधकांना पडताळून पाहण्यात यश आले आहे. आज इथे उद्या तिथे या पुस्तकात ज्या आख्यायिका , दंतकथा आल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे,

केदारनाथ म्हणजे महादेव पण इथे लिंग नाही शाळुंका नाही. घोड्याच्या अथवा महिषाच्या वशिंडासारखा हा पाषाण आहे. ह्या ठिकाणी पांडव येऊन गेले. त्यांची कथा लेखिकेने पुढीलप्रमाणे दिली आहे. आपल्या हातून चुलतभावांच्या हत्येचे पातक घडले. धर्म धर्म म्हणत आपण धर्मयुध्द खेळलो नाही. युध्दाचे जे नियम होते ते आपण डावलले, भीष्म द्रोण कर्ण दुर्योधन सगळ्यांना अधर्माने मारले आहे. कपटाने जग जिंकले आहे....... या सगळ्या गोष्टी युधिष्ठिराच्या मनाला खात होत्या. युध्द संपले. सर्वनाश झाला. राज्य भोगावयास राहिले ते पाच पांडव...... वृध्द व विधवा स्त्रिया डोळ्यांदेखत सगळे नाहीसे झाले. सोन्याची व्दारका बुडाली. कापरासारखे सगळे जळून गेले. विफल होऊन कैलासाला जाताना पांडव इथे केदारांच्या दर्शनाला आले. पृ.२४.

हेमवती व चंद्र यांचीही आख्यायिका लेखिका पृ. ५६ वर देतात.

चिनार हा दिवसरात्र प्राणवायु सोडतो आणि त्याच्या सान्निध्यात जर कुठल्याही आजारी व्यक्तीला ठेवली तर ती खणखणीत होणारच ! पृ. ७५.

पद्मपूर गावचा राजा एकदा आजारी पडला. राजवैद्यांनी आजारातून त्याची सुटका केली. राजा खुश झाला व त्याने आपल्याजवळचा कंद त्याला बक्षीस दिला..... वैद्याने तो कंद पाहिला व त्याने तो फेकून दिला........ पृ. ८६.

हरद्वारचा गंगेचा एक फाटा इथे हुगळी बनून राहिला आहे. इथल्याच सुंदर वनात कपिलमुनीचा आश्रम होता. सागर राजाचे साठ हजार पुत्र जेव्हा हल्ला करण्यास आले

तेव्हा मुनींनी डोळे उघडले आणि ही सागराची मुले जिथल्या तिथे भस्म होऊन गेली. पुढे भगिरथ त्यांच्या शोधार्थ आला. तूच त्राता म्हणून त्याने कपिलमुनीचे पाय धरले, मुनिवर्य द्रवले आणि त्यांनी उपाय सुचवला. हिमालयातून गंगा आणावी, ती या सागरपुत्रांना राखेतून उठवण्यास भारी होईल. ती ही गंगा...... दऱ्या ओलांडीत खडक भेदीत बर्फाचे पाणी करीत आलेली ही भगिरथाची दुहिता........ पृ. ९७.

नरमेधाची रूढी वेदकाळापासून होती. बळी जाणारी माणसे द्रव्याने विकत घेतली जात. इश्वाकू कुळातील राजा हरिश्चंद्र याला मुल नव्हते. याकरिता यज्ञ केला गेला होता. आणि वरूणाने आपण पुत्र देऊ पण तोच पुत्र आपल्याला परत बळी पाहिजे असं फर्मावलं. राजाने रोहित तरूण होईपर्यंत वरूणाला झुलवित ठेवलं. पण वरूण एकसारखा छेडीत राहिला तेव्हा एका गरीब दरिद्री ब्राम्हणाला शंभर गाईच्या मोबदल्यात विकत घेऊन त्यालाच वरूणाला अर्पण करण्याचे ठरविले. अशी पौराणिक आख्यायिका लेखिका देतात. पृ. १००.

पौराणिक कथांमध्येच कसा फरक आहे. हे लेखिका उदाहरण देऊन सांगतात. आपला गणेश ऋध्दि सिध्दींना जवळ घेऊन बसलेला तर बंगाली गणेश ब्रम्हचारी तर कार्तिक उत्तमकुमारसारखा दोन दोन बायकांचा नवरा..... आमची राई रखुमाई ही बंगालची राधा. आणि ही राधा कृष्णावर रूसत नाही तर ती अभिमान धरते. पृ. १०३. लेखिका भूताविषयीचीही आख्यायिका पृ. ११९ वर देतात.

जगन्नाथपुरी येथील 'नवकलेवर' सोहळा याविषयीची आख्यायिका लेखिका देतात. पृ. १३७.

जगन्नाथपुरीविषयीची दुसरी आख्यायिका अशी की, ज्याला मूळ ओंडक्याचे

राजाबरोबर दर्शन झाले त्या विद्यानंद ब्राम्हण पुजाऱ्याचा वंशराजा शोध घेण्यात येतो. त्यांची परीक्षा घेण्यात येते. मूर्ती बदलताना पुजाऱ्याचे डोळे बांधण्यात येतात. त्यावेळी जगन्नाथ आपल्या मूळ विष्णु रूपात पुजाऱ्याला दर्शन देतो. मरणाऱ्याची इच्छा पुरवली जाते तशी याची इच्छा पुरवली जाते. त्यादिवशी मान या पुजाऱ्याचा. प्रथम नैवेद्य या पुजाऱ्याला नंतर जगन्नाथाला.... या पुजाऱ्याचा मग मृत्यू होतो म्हणतात. तरी 'भितरेच्छ महापात्र' होण्यास या विद्यानंद ब्राम्हणाचा वंशज आतूर असतो पृ. १३७.

नाव जगन्नाथ शेजारी बलराम सुभद्रा........ अवतार विष्णुचा अर्थात लक्ष्मी ! बायको नीरगांठ म्हणून सोडावी तो गांठ होऊन बसते. रथयात्रेला जाताना जगन्नाथ आपल्याला बरोबर नेत नाहीत म्हणून ही लक्ष्मी रूसते आणि मंदिरात बसते. इथे जगन्नाथाचा रथ अडला तो पुढे जाईना आणि लक्ष्मी दार उघडेना. तेव्हा जगन्नाथ रथातून खाली उतरून मंदिरात आला. पण लक्ष्मीने दरवाजा किलकिलासुध्दा केला नाही इतक्यात एक देवदासी 'गीतगोविंदा' तली अष्टपदी म्हणत येत होती.......... आणि मघापासून बंद असलेली मंदिराची दारे उघडली. लक्ष्मीने ती गीत गोविंदातली अष्टपदी ऐकण्याकरता भान ठेवत दारं उघडली होती....... जगन्नाथही अष्टपदीत रंगून गेला. शेवटी यात्रा अर्धी तशीच टाकून बलराम सुभद्राही आत आले. त्या वेळेपासून दर वर्षाला रथयात्रेला जाताना जगन्नाथाच्या हातात अष्टपदीचा १९ वा अध्याय लिहिलेला मखमलीचा तुकडा देतात. त्याशिवाय सकाळ संध्याकाळ ते जगन्नाथ निजेपर्यंत गीतगोविंदावर नृत्य गायन किर्तन चालते. पृ. १६९.

अशा प्रकारच्या दंतकथा लेखिकेने आपल्या प्रवासवर्णनात अंतर्भूत केल्या आहेत.

**'देखणी दक्षिण' या पुस्तकलेखनाचे विशेष :**

**वरीलपुस्तकातील आख्यायिका / दंतकथा :**

दंतकथा या समाजातच निर्माण होतात व समाजातच विस्तार पावतात. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्यांचे संक्रमण होत असते. अशा कथांच्या उगमापाठीमागे घटनाप्रसंग घडून गेलेला असतो. काही दंतकथा या काल्पनिकही असू शकतात. तर काही दंतकथा या वास्तवावर आधारलेल्या आहेत. आपली रामायण, महाभारत, संस्कृतमधील पुराणग्रंथ यामध्ये बऱ्याच आख्यायिका, दंतकथा सापडतात. तर भारतामध्ये ती प्राचीन शिलालेख, मंदिरे आहेत त्यांच्या निर्मितीची कारणे किंवा त्यांचा उगम कसा झाला याचा उलगडा प्रचलित असलेल्या आख्यायिकावरून होतो. जे गुपित आहे, जे सत्य आहे ते या आख्यायिका, दंतकथाद्वारे बाहेर पडते व ते जनमाणसात पसरत राहते. त्यामध्ये काही नित्यन्युतनताही असते. काही दंतकथा शेकडो वर्षे आहे तशा अस्तित्त्वात राहतात. ह्यासंदर्भात डॉ. मु. ब. शहा यांचे मत पुढीलप्रमाणे ''प्राक्कथा म्हणजे प्रगाढ धर्मविषयक गरजा, यांच्या समाधानापोटी सांगितलेल्या, आदिम वास्तवाला जिवंत करणाऱ्या कथा.''[५] दंतकथेतून उद्बोधन उपदेश हे सुध्दा घडले जाते. सामाजामध्ये ज्या विविध चालीरिती, रूढी परंपरा, किंवा प्राचीन मंदिरे, ह्या निर्मितीमागे एखादी घटना प्रसंग असतो. तेव्हापासून त्या घटनेचे महात्म्य किंवा वास्तवता ही एखाद्या कथनाव्दारे सादर केली जाते व तिचा प्रवास जनसामान्य माणसातून मौखिक रूपाने पुढे चालू राहतो. वरील पुस्तकात ज्या दंतकथा, आख्यायिका आलेल्या आहेत त्या पाहू.

केरळ भूमीविषयीची आख्यायिका सांगितली आहे. भार्गव परशुरामाने सागर मागे हटवला आणि ही सुंदरभूमी सागराच्या तळातून काढून आपल्या आवडत्या पुत्रांना

दिली म्हणतात, म्हणून हे लोक जमिनीवरून अनवाणी चालत असत. ज्या जागेवर परशुरामाचा पदस्पर्श झाला, ती जागा पादत्राणे घालून विटाळून कशी चालेल ? अशी तेथील लोकांची त्या भूमीविषयीची समजूत आख्यायिकेच्या आधारे लेखिका नमूद करतात. पृ. ३९,४०.

तृतीयपंथी विवाह पध्दती जी कुवागम नावाच्या खेड्यात चैत्र पौर्णिमेला ही लग्ने होतात. तेथीलच 'आरावण' च्या मंदिरात हे लोक एकत्र येतात. त्या विषयीची कथा लेखिका देतात. कुरूक्षेत्रावर भारतीय युध्द सुरू होण्यापुर्वी एक विचार आला, तो असा की भूमीला एका पूर्ण पुरूषाचे दान द्यायला हवे, तर पांडवांना युध्दात जय मिळेल. पांडवांमध्ये श्रीकृष्ण, अर्जुन व नागकन्या उल्लपीला झालेला अर्जुनपुत्र आरावण हे तिघे पुर्णपुरूष होते आणि आरावण पुढे आला; पण त्याने एक इच्छा व्यक्त केली. आपण लग्न करू इच्छितो. बळी जाणाऱ्या पुरूषाला मुलगी कशी मिळणार ? शेवटी श्रीकृष्णाने स्त्रीरूप घेतले आणि आरावणाचे लग्न झाले. एक क्षण भोगून आरावण सहस्त्र मरणे भोगायला गेला. अशी कथा दिली आहे. पृ. ५७.

मदुराईच्या मिनाक्षी मंदिराविषयी तर लेखिका पुष्कळ लिहितातच, त्याचबरोबर एक आख्यायिका मिनाक्षी व शिव यांच्यातील युध्दाची देतात. मिनाक्षी ही मलयध्वज राजाची मुलगी. पुत्रप्राप्तीसाठी या राजाने यज्ञ केला आणि निपजली कन्या. राजाने तिलाच पुत्र मानले. तिला तीन वक्ष होते. जन्मल्यावर आकाशवाणी झाली. तिच्या जोडीदाराचे, तिच्या भावी पतीने दर्शन झाल्यावर तिचे तिसरे वक्ष नाहीसे होईल.

पाहता पाहता बालपण निसटून गेले. मुलगी वयात आली. यौवनाने मुसमुसली, चिंच गाभुळली; पण तिच्या लग्नाची काळजी करीत करीत पिताच निघून गेला.

बापाचे निधन झाल्यावर ही राणी झाली आणि एक दिवस शिवाशी युध्द करण्यास कैलासावर गेली. शिवाला पाहता पाहता ही हरखून गेली, मोहरून गेली, हरवून गेली. हाच आपला जन्मजन्मांतरीचा सहचर हे मनोमन उमगली. नुसत्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही, हे तिला कळून चुकले. युध्दाचे रूपांतर प्रेमात होऊन बसले. रणांगणाचे बोहले झाले. चैत्र पौर्णिमेला कदंब वृक्षाखाली त्यांचा विवाह झाला. भाद्रपद महिन्यात जेव्हा मूळ नक्षत्र असते, तेव्हा हा 'अवनिमुलम' विवाह उत्सव साजरा होतो. पृ. क्र. ६६,६७

तिरूपतीच्या नाकाला जी पट्टी आहे, त्याचीही कथा लेखिका देतात. भृगुऋषींना एकदा एक शंका आली व तिचे उत्तर विचारण्यासाठी ते कैलासावर गेले. शंकर पार्वतीला जवळ घेऊन प्रेमकुजन करण्यात दंग होते. ही समाधी युगानयुगे चालणार होती. ती मोडण्यास कुणीच पुढे आला नसता. त्यातून शंकर म्हणजे बडे प्रस्थ, देवांचा देव, महादेव. ऋषी विद्‌वान पण गरीब माणूस शंकरांनी याकडे ढुंकून पाहिले नसणार. भृगू मग ब्रम्हदेवाकडे गेले. ब्रम्हा सरस्वती व गायत्रीच्या अलिंगनात होते. त्यांना तिथून तसेच हलणे अशक्य होते. त्यांनी ऋषींच्या कवनाकडे कानाडोला केला. ऋषी संतापले आणि धुमसत वैकुंठाला आले. तिथेही श्रीविष्णू लक्ष्मीला घेऊन शेषासनावर पहुडलेले..............

आता ऋषींचा पारा चढला. ते स्तुतिसुमने वाहायची विसरले आणि आत जाऊन श्रीविष्णूंना एक जबरदस्त लाथ घालून त्यांनी उठवले. पण विष्णू रागावले नाहीत. उलट त्यांनी ऋषींचा पाय हातात घेतला व तो दुखावल्याबद्दल क्षमा मागून तो कुरवाळायला सुरूवात केली. भृगुऋषी पाण्यातल्या ढेकळासारखे विरघळून गेले आणि या 'कवंडळ' पणात आपण सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम देव हे बिरूध्द त्यांनी घेतले. लक्ष्मीला हा अपमान सहन झाला नाही आणि निषेध दाखविण्यासाठी तिने श्रीविष्णूकडे फारकत घेतली व ती सरळ

भूलोकी आली.

पण श्रीविष्णूंना अशी सखी, सहचरी, प्राणयिनी कुठून मिळणार ? आणि पाय चुरायला अशी दासी ? त्रिभुवन धुंडून अशी मिळाली असती का ? ते अगदी रडकुंडीस आले.

पण ते श्रीविष्णू होते. ते मुत्सद्दी, कावेबाज होते. त्यांनी धोरणीपणा गहाण ठेवला नाही. तिच्यामागे जाण्याचा बाईलवेडेपणा त्यांनी केला नाही. ते गुप्तपणे अरूणाचल पर्वतावर आले आणि एका गुहेत जाऊन ध्यानस्थ बसले. श्रीविष्णूने जरी ताकास तूर लावू दिला नाही तरी या बेबनावाचा सुगावा ब्रम्हा, शंकर यांना लागला, त्यांनी त्या दोघांत समझोता करण्याचा प्रयत्न केला; पण लक्ष्मी इरेस पेटलेली...... ती घरी येण्यास तयार होईना आणि श्रीविष्णू नाकदुऱ्या काढायला येईनात. देवांना कळले नाही, काय करावे ते !

पण नंतर लक्ष्मीचा पारा खाली उतरला. देवांनी लक्ष्मीला युक्ती सांगितली. ब्रम्हा, महेश हे गाय–वासरू झाले आणि लक्ष्मीने गवळणीचे रूप घेतले. राजाला ही गाय–वासरू नजराण्यादाखल दिली गेली.

जेव्हा जेव्हा राजाचा गवळी गाय–वासरांना घेऊन शेषाचल पर्वतावर चरायला घेऊन जाई, तेव्हा त्याने हेरले की, गाय कास रिकामी करते. गवळ्याला मग राजाच्या संतापाला तोंड द्यावे लागे. त्याची कानउघडणी सहन करावी लागे. राजाच्या या कानपिचक्या ऐकून गवळ्याचा संताप अनावर झाला आणि त्याने गाईच्या मस्तकावर प्रहार केला. श्रीविष्णू धावत आले तेव्हा तो प्रहार ओझरता त्यांच्या नाकाला लागला व नाकातून रक्त वाहू लागले. ती ही तिरूपतीने लावलेली मलमपट्टी होय. पृ. ९१,९२.

पृ. १११ वर गिधाडांची दंतकथा दिली आहे. चिंदबर नगरला ग्रामरक्षकच्या

मुर्ती पाहण्यात आल्या. त्यांचीही दंतकथा लेखिका वर्णन करतात. पृ. १२४.

**आज इथे..... उद्या तिथे मधील शिल्पवर्णन / वास्तुवर्णन :**

महाराष्ट्रातील वेरूळ, ओरिसातील कोणार्क आणि दक्षिणेकडील मिनाक्षी मंदिर ही शिल्पे, मंदिर पाहून प्रेक्षक अवाक होऊन जातो. त्यांच्या या वास्तुकला, शिल्पकला पाहून, त्यातील भव्यता, सुंदरता, वास्तवता आणि विविधता वाखानण्याजोगी आहे. प्रत्यक गोष्ट त्यांनी वेगळेपणाने करण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्य आणि भारतातील शिल्पकलेचा विचार केला तर असे दिसून येते की, दोहोंचा उगम हा धार्मिक स्वरूपाचा जरी असला तरी, दोन्हीमध्ये बरीच तफावत जाणवते. दोन्हीतही देवतांनाच अग्रस्थान दिलेले आहे.

पाश्चात्यांनी बाह्य स्वरूपाला महत्त्व दिले आहे तर भारतीय शिल्पकार हे अंतरंगाचे महात्म्य व्यक्त करतात. दोन्हीवर निसर्गाचा कसा भिन्न स्वरूपाचा परिणाम झाला ह्याचेच दर्शन घडवताना दिसतात. भारतीय कलेत निसर्ग आणि मानव यांची एकरूपता साधण्याचा प्रयत्न असतो. ह्या संदर्भात म. ना. लोही ह्यांचे मत विचारात घेऊ ''भारतीय शिल्पकारांचे समाधान शारीरिक सौंदर्याच्या दर्शनाने कधीच झाले नाही. त्यांना निसर्गातील चैतन्य आणि जीवनातील उदात्तता यांचे एकत्र दर्शन घडवण्याचे होते, म्हणून निसर्गानुकरणाचा मार्ग सोडून वेगळ्याच तऱ्हेने त्यांनी कलानिर्मिती केली. त्यांनी वक्र आणि प्रवाही रेषांचा आणि प्रतिकात्मक आकारांचा आश्रय घेतला. म्हणूनच भारतीय कलाकाराने घडवलेल्या कोणत्याही आकृतीत एक प्रकारची लय आणि गतिसूचक वक्रता आढळून येते. तिच्यात डौलदारपणा व घाटदारपणा दिसतो. गती आणि लय यांच्या आधारामुळे कोणतीही आकृती वास्तवातल्यासारखी सरळ उभी नसते.'' [६] भारतीय शिल्पकलेचा विचार केला तर

तर भारतीय शिल्पकला ही शृंगारप्रधान आणि मैथुन प्रधान आहे. यांचे अलंकार पुरूषांचे अलंकार, स्त्रीचा शृंगार इतका अप्रतिम असतो की, तो एक सौंदर्याचा घटक बनून राहिला आहे. ह्या शिल्पकलेतून हेही दिसून येते की, मानवी आकृती निसर्गाशी एकरूप होत असली तरी, वास्तवाचा विपर्यास करणारी असते. भारतातील शिल्पकार हे निसर्गातील रमणीय जड चेतनांचे मोहक आकार मानवी अवयवांना देताना दिसतात तर पाश्चात्य हे तसे करताना दिसत नाहीत. हाच दोन प्रकारच्या शिल्पकलेतील मुलभूत फरक म्हणून आपणास पाहता येईल.

**देखणी दक्षिणमधील शिल्पवर्णन / वास्तुवर्णन :-**

भारतातील शिल्पकार हे ज्या मुर्ती कोरतात ज्या वास्तू घडवतात ह्या खरोखरच उत्तम शिल्पकलेचा नमुना म्हणून जगप्रसिध्द पावला आहे. शिल्पकलेतून शिल्पकारांनी शिल्पांच्या अंतरंगातील भावनांना आवाहन केले आहे. त्यांच्या प्रत्येक भाव-भावना त्यांच्या शरीराच्या प्रत्येक अवयवावरून त्यांनी कोरल्या आहेत. शिल्पांच्या मनातील कोलाहल, गोंधळ, मादकता, उत्साह, क्रोध, हर्ष, नवरसांचे सादरीकरण त्यांनी आपल्या कोरीव शिल्पातून केले आहे. कामवासना ही तर त्यांनी वेगवेगळ्या शिल्पकृतीतून दाखवून दिली आहे. याबरोबरच शांत निरागस, कोमल अशा भावनांनाही त्यांनी शिल्पकृतीतून वाट करून दिली आहे.

भारतीय शिल्पकार जसे अंतरंगाचा वेध घेतात. तसेच ते स्त्री पुरूषांच्या शृंगार, अलंकाराचेही तितक्याच सुक्ष्मपणे कोरीव काम करताना दिसतात. प्रत्येक अलंकार त्यांनी उठावदार व वास्तवाच्या पातळीवर कोरला असून त्याच्यात वैविध्यपुर्णता आहे. काही शिल्पकृती या त्यांच्या स्वत:च्या वेगळेपणामुळेही लक्षात राहतात. उदा. खजुराहो

येथील मंदिरावरील मिथूनशिल्पे त्यांच्या वेगळ्या शैलीमुळे दिर्घकाळ मनात राहतात.

तसेच भारतात ज्या काही प्राचीन वास्तुकला आहेत. त्यांचेही सौंदर्य अप्रतिम असे आहे. शिल्पकार यांनी संपुर्ण जगामध्ये आपल्या शिल्पकलेचा दबदबा निर्माण केलेला आढळून येतो. ह्या संदर्भात म. ना. लोही म्हणतात, ''ग्रीसच्या अथेन्स व स्पार्टा या प्राचीन नगरराज्यात आदर्श पौरूष आणि आदर्श स्त्रीत्व यांची जोपासना करण्याचे ध्येय निश्चित झाले होते. या राजकीय विचारांचा प्रभाव शिल्पकलेवर न पडता तरच नवल ! त्यामुळे तिकडच्या शिल्पकलेतील पुरूष पुष्ठता आणि डौल स्पष्टतेने घडवण्यात मग्न दिसतो. पाश्चात्य कलेतील व्हर्क्युलस आणि लोकून हे दोन पुतळे उत्कृष्ट शरीर सौष्ठवाचे नमुने आहेत.''[७] दक्षिणेतल्या मंदिराची भव्यता त्यांच्या गोपुरातच तोलली जाते. जास्तीत जास्त उंच गोपुर बांधणे हे त्या वेळचे समृध्दीचे लक्षण....... उत्तुंगतेचे लक्षण, राजेशाहीच्या मस्तकावरील तुरा, परकियांशी झगडताना देवालयातील मूर्ती विटाळू नये, ही सोवळी सनातन कल्पना ही गोपुरे बांधण्यामागे होती. किल्ले कोट नाहीत. प्रदेश सपाट, तेव्हा शत्रूची टेहळणी, त्याच्याशी दोन हात करण्यासाठी ढालीसारखा या गोपुरांचा उपयोग होत असे आणि अरिष्ट, पूर या संकटांना ही गोपुरे आईच्या मायेने कांगारूसारखी लोकांना पोटात घेऊन बसत. पृ. १५ असे मंदिराच्या रचनेचे विशेष व महत्त्व वर्णिले आहे. पुढे त्या रामानुजनचा चेला होयसाळ राजा मिलिंद यांने चोला राजांना हरवल्यानंतर विजयाचे प्रतीक म्हणून या पत्थरातून कलाकृती कोरल्या. हे हळेबीड मंदिर याचेही वर्णन व माहिती देतात. हळेबीड मंदिर म्हणजे आर्यत, द्राविडियन संस्कृतीचा मिलाफ असे सांगतात. नागज, मल्लप व दारूप या तीन शिल्पकारांच्या तीन पिढ्यांची ही किमया, सर्वस्व अर्पण केल्यामुळे ही कला सजीव झाली. तेथील दगड कोरायला कठीण. काळा खडक, पत्थर; तरीपण हे

रेशमाच्या विणीसारखे कोरीव काम, अप्सरांच्या वस्त्रावरील चुण्या, मेखलांवरील नक्षी, अलंकाराची कलाकुसर हे सगळे अवर्णनीय आहे. पृ. १६ मुर्तीचेही वर्णन लेखिका करतात. काही मुर्ती पोकळ आहेत. त्यांच्या कानांतून काडी घातली तर तोंडातून बाहेर येते. एका कानातून घातली तर दुसऱ्या कानातून बाहेर येते. काहींची काडी मात्र जिथल्या तिथेच राहिली. थोडे लोक, एका कानातून ऐकले तर दुसऱ्या कानातून सोडून देतात. काही महाभाग ऐकलेली अफवा दाहीदिशांना पसरवतात, तर थोडे ऐकलेले आतल्या आत ठेवून देतात. पोटातल्या पोटात दडवून ठेवतात. त्याचे हे विश्लेषण..... ही व्यंगोत्री असेल का असा लेखिका स्वत:च प्रश्न उपस्थित करतात. पृ. १८ अशी एकापेक्षा एक व सरस वर्णने लेखिका करतात. यापुस्तकात आणखीही काही वर्णने आली आहेत त्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक पुढीलप्रमाणे २९, २२, २३, ४४, ५२,५३, ६०, ६६, ६७, ६८, ६९, ७४, ७८, ७९, ८९, ९०, ९४, १०४, ११२, १२५, १२४, १२७, १२८.

मंदिरांचे वर्णन करून शिल्पकलेचेही वर्णन सुंदररीत्या केले आहे. त्याबरोबरच ऐतिहासिक वास्तूंचेही त्यांनी वर्णन केले आहे.

**आज इथे..... उद्या तिथे स्थळवर्णने / शहरांचे विशेष :**

प्रवासकर्ता हा जेव्हा एखाद्या प्रदेशातून प्रवास करत असतो तेव्हा तो तेथील प्रदेश कसा आहे हे सांगत नसतो तर तो प्रदेश त्याला कसा भावला हे सांगत असतो. त्याला बऱ्याच गोष्टींना बगल द्यावी लागते व काही निवडकच घटना प्रसंगावर लक्ष केंद्रीत करून ते वाचकांपर्यंत कलात्मक पातळीवर आणून प्रतित करून द्यावे लागते. तरच त्या लेखनाला ललितलेखन म्हणून मान्यता पावते. व वाचकवर्गही तो स्वीकारतो नाहीतर शहरांचे वर्णन आहे तसे केले तर वाचकवर्ग त्याकडे पाठच फिरवितो. ह्यासंदर्भात एकमत विचारात घेऊ.

''प्रवास वर्णन लिहिणाऱ्या लेखकांची भूमिका केवळ वाचकांना आपण पाहिलेला प्रदेश समजावून सांगावा, त्याला ठाऊक नसलेल्या प्रदेशाची व ठिकाणाची माहिती द्यावी अशीच आढळते. आपल्या प्रवासातील मुक्काम, तेथे पाहिलेले आणि अनुभवलेले जे जे असेल व त्याच्या दृष्टिने जे महत्त्वाचे असेल, त्याचा सुबोध परिचय करून देण्याची भूमिका असते. काही लेखक धार्मिक स्थळांच्या वर्णनावेळी त्या स्थळांचे धार्मिक महात्म्य कथन करण्यावर भर देतात. लोकांना शहाणे करून सोडण्याची आणि त्यांना प्रवासाची उपयुक्त माहिती वा ज्ञान देण्याची भूमिका साऱ्याच लेखकामध्ये बलवत्तर झालेली जाणवते. आपल्या पायाखाली तुडवलेल्या भूभागांचे यथातथ्य आणि 'फोटोग्राफिक' असे वर्णन केले की काम झाले, हीच भूमिका अधिकांश लेखकांची जाणवते.''[८]

उषा पाणंदीकरांनी त्यांच्या आज इथे उद्या तिथे या पुस्तकामध्ये शहरांचे वर्णन केले आहे. तर त्या शहरांच्या विशेष गोष्टीकडे लक्ष वेधून घेतात व त्या कलात्मक पातळीवर त्याचे लेखन करतात. ह्या पुस्तकात आलेल्या शहरांचे केलेले वर्णन पाहू.

लेखिकेने श्रीनगर पाहिले. त्यांनी रामपूर गावातली आठवण ही नमूद केली आहे. बुटक्या हॉटेलच्या सभोवतीचे मोठमोठे वृक्ष शापित वाटत होते. कातर संध्याकाळी ते जिवाचा थरकाप उडवित होते. पृ. २९

लेखिका झाशी विषयी सांगतात. खुद्द झाशीत काहीच नाही. एक मोडका किल्ला व त्यात लक्ष्मीबाईची खोली व राणीने इंग्रजाशी लढताना जिथून तटावरून घोडा खाली दौडला ती जागाही पाहिली....... पण मनाच्या तळावर उरली ती जवळच असलेली खाणावळ. 'लक्ष्मीबाईंची खाणावळ' 'मेरी झांशी नहीं दूँगी' म्हणून वीरमरण पत्करणाऱ्या लक्ष्मीबाईने ही खाणावळ बघितली असती तर तेव्हा मरण पत्करणाऱ्या या मोरोपंत

तांब्याच्या मुलीने आत्महत्या केली असती. बाकी ही झाशी कृतघ्नच............ ती लक्ष्मीबाईंची समाधी....... खूण काहीच ठेवत नाही.

ग्वाल्हेर हे मध्यप्रदेशातले हे बुलंद गडगंज संपन्न संस्थान. या संस्थानचा ३०० फुटांवरचा जुना किल्ला पहावा. दुर्ग अतिशय बळकट दोन मैल लांबीचा आहे. मोठे बुरूज असलेल्या दगडी भिंती ३५ फूट उंचीच्या आहेत. या किल्ल्याचे खूप उल्लेख आहेत. गोपगिरी गोपाद्री...... गोपाचल अर्थात एक निष्कर्ष निघतो.......... गोपाल ग्वाल.......... आणि या वरून ग्वालेर. ग्वालिप्पा संत ह्याविषयी माहिती दिली आहे. तसेच अनेक राज्ये होऊन गेली. त्यांच्या आडनावांचाही उल्लेख लेखिका करतात. पृ. ४७, ४८. येथीलच राजा मानसिंग हा सुंदर राजवाडा म्हणजे किल्ल्याचे भूषण आहे. पृ. ४८ तेथेच पाहण्यासारखा म्हणजे 'गुजरी महल' आहे. तसेच तानसेनचा जन्म कसा झाला हेही सांगितले आहे. पृ. ४८

लेखिकेला ग्वाल्हेरची जिलेबी खूप आवडली. त्या म्हणतात 'ग्वाल्हेरची जिलेबी सांगते...... मनाने अंबट असून बाहेर शर्करेचे वेष्टण अवगुंठन लेवून ही अगदी पोटात शिरते...... मनात जाऊन बसते. ही 'जिलेबी' आम्हाला तरी खूप आवडली. दुधाबरोबर ती आम्ही खूप खाल्ली.' पृ. ५२

हरयाणा सुखी आणि संपन्न दिसत होता. ठिकठिकाणी अलिशान रेस्टॉरंटस् आणि त्याच्यावरच्या गार वेली डुलत स्वागत करीत होत्या. सगळ्या वाटेवर हिरवागार रंग डोळ्यांना थंडाई देत होता. वरचे गर्द निळे आकाश मनावर मोरपिस फिरवीत होते. मन उप्पाट भरून निघालं होतं. कुशीला दुतर्फा सुरू वृक्षांची रांग....... मधे–मध्ये चवीला बोगन वेलीयास..... समजा आणखी रस्ता रुंद करावा लागला तर निलगिरी नव्या वृक्षांची खडी

तालिम......... मध्येच कांचन शिरीष वृक्षाचे फुलांचे घोस आपली जातकुळी सांगून जात. काही वृक्षांवर 'सर्वस्वी तुझीच' म्हणून गोल गोल वळसे घालून अष्टांगाने आलिंगणाऱ्या मधुमालती कशा बहरून आल्या होत्या व तेही वृक्ष एखाद्या मिलनोत्सुक पुरूषाप्रमाणे त्यांना कवटाळून बसले होते. सगळे फुलमय. हरिविजयातल्या राधेचे वर्णन इथूनच केले असावे.

पर्यावरण......... पर्यावरण नुसता उध्दारच नव्हता तर ते अंगिकारलं गेलं होतं. जगलेली झाडे जोपासणं तर चाललंच होतं..... पण मेलेल्या झाडांच्या जागी नवी रोपटी लावली होती. पृ. ६४.

रावी–बियास–चिनाब–झेलम–सतलज या पाच लोकमातांनी आंदुळलेला हा 'आब' म्हणजे पंजाब. पंच नद्यांचा प्रदेश. इथे पुर्वी सात नद्या होत्या. या प्रदेशाचे नाव सप्तसिंधव होते. मानवी जीवन इथेच या सरस्वती नदीच्या सुजलाम् सुफलाम् भूमीत अंकुरले. यज्ञ याग वेद इथेच प्रसवले..... पण नंतर ग्रीक इराणी अरबांचा प्रवेश झाला. घोरी ,गुलाब, खिलजी, तुघलक........... संघर्ष सिकंदरपासून सतत चालू होताच............. सतत संघर्ष........ लढाई.......... पंजाबने वेगळे काहीच पाहिले नाही. देखले नाही. पृ. ६५ अशी व आणखीन खूपच माहिती लेखिका या प्रदेशाबद्दल वर्णन करतात.

दिल्ली अंबाला रस्त्यावर पानिपत व कुरूक्षेत्र ही स्थळे लागतात. या मरूभूमीचा पायगुणच असा की दिल्लीचा प्रत्येक सत्ताधीश इथं हरला गेला आहे. उलट उपरा जिंकला आहे. इब्राहिमखान लोदी आणि अफगाण बादशाह बाबर. लोदी इथं मारला गेला आहे. पृथ्वीराज चौहान व कुतुबउद्दीन घोरी. चौहान इथं पराभूत आहे. दिल्लीपती हिमूने अकबराशी नमते घेतले आहे.

पानिपतरवर लेखिका मराठ्यांच्या युध्दाच्या जागेची चौकशी करतात. तेव्हा

त्यांना कळते की, जिथे मराठ्यांची लढाई झाली त्या जागेला 'काला आम' म्हणतात. लहान, ढासळलेल्या देवी मंदिराशेजारी लाल फत्तरानी बांधलेल्या एका तळ्याकडून लेखिका पुढे येतात. साधारण बारा चौदा फूट चौरस जागा. सभोवती लोखंडी गंजलेले पहारीसारखे टोकाचे गज, मधे एक तुलसीवृदांवन. त्याच्यावर एक भाल्यासारखी टोकदार पहार............ ही हीच जागा ! अशी त्या तेथील स्थळाचे वर्णन करून तेथील इतिहासही कथन करतात. पृ. ६६.

अमृतसर याचा उच्चार अमरतसर असा पंजाबमध्ये होतो. चारशे वर्षापुर्वी एक साधू म्हणजे शिखांचे चौथे गुरू रामदास एका उजाड माळावर एका लहानशा झऱ्याच्या काठी पोहचला व ते निर्मळ उदक पाहून त्याने तिथेच आपली पथारी सोडली. शिख धर्माचा संस्थापक नानकसुध्दा इथेच या निर्झराकाठी प्रार्थना करीत असे......... तो हा आजचा अमृतसर तलाव............ गुरू रामदासांनी या तलावाला आपले नाव नाकारले होते पण 'गुरू का चरक' हे नाव दिले गेले. पृ. ६८.

जालियनवाला बागही पाहण्यात आला तेथील सर्व घटनाप्रसंगाचे वर्णन लेखिका करतात. तसेच जनरल डायरचेही वर्णन केले आहे. पृ. ७१.

जम्मूलाही त्यांनी भेट दिली. लेखिका लिहितात, जम्मू ही काश्मीरची हिवाळी राजधानी. ती स्वत:ला देवळांचे शहर म्हणवते. इथेच करणसिंगच्या हिवाळी राजवाड्यात करणसिंगचा हिवाळी राजवाड्यात करणसिंगच्या पुर्वजांच्या तसबिरी पाहिल्या. चिनाब नदी पाहिली. तिथेच त्यांना पहाडी गुजर लोक भेटले. त्यांचा व्यवसाय शेती याचीही माहिती लेखिका नमूद करतात. पृ. ७२,७४.

काश्मिर म्हटले की श्रीनगर........... त्याचे सुंदर हिरवे निळे मोरपिशी डोंगर,

स्फटिकारसाखे जलाशय........ त्या निळ्या पाण्यातली पांढरी लाल कमळे.......... पाण्यात डोकावून पहाणारे कदल......... पूल....... आकाशाची आभिलाषा धरणारे चिनार...... सर्वांगाने भेटू पाहणारी चिडाची झाडे उंच सरळसोट फर, पॉप्लर......नावाप्रमाणेच सफेद असा सफेता....... वर निमुळती होत गेलेली 'यर' पाईनची झाडे, छपरावर छप्पर ही कोडी घालणारी बदाम झाडे.......असे सुंदर वर्णन या परिसराचे केले आहे. पृ. ८३

पांपुर म्हणजे पद्मपूर गाव. या गावचे महत्त्व एवढे की भारतातले केशर फक्त इथेच या गावातच पिकते. फक्त एवढ्याच भागात विपुल प्रमाणात केशरचे पिक घेतले जाते. त्याच्या लागवडीची पध्दतही त्यांनी वर्णिली आहे. पृ. ८६

दार्जिलिंग पाहून असे वाटते बंगालात राहून किती वेगळे हे दार्जिलिंग कलकत्त्याची हवा गरम तशी माणसेही गरम....... बारीक चणीची चिडचिडी करणारी एकमेकावर धावणारी. तर दार्जिलिंगमधील एकमेकाकरिता धावणारी. बाकीची भूमी सपाट हवा गरम..... इथले चढउतार.......तिथले थंडीचे दिवससुध्दा अंगावर घामाची पुटे चढवणारे....... तर इथले उन्हसुध्दा अंग गोठवणारे........ पृ. १२०.

भुवनेश्वर म्हणजे पुर्वीची राजधानी कटक. ओरिसा म्हणजे ओडिसा...... उडिसा. पुरातन कलिंग देश. औड्र उत्कल, सुधन्वाचा पुत्र उत्कल याच्या नावाचा कृष्णा ते महानदीपर्यंतचा प्रदेश....... या देशाची पूर्वीची राजधानी भुवनेश्वर होय. ही गोव्याचीच भूमी लेखिकेला वाटत होती. एवढे या भूमीमध्ये साम्य वाटत होते. भुवनेश्वर ही ओडिसाची कटकला डावलून केलेली राजधानी. रेल्वे लाईनने या शहराची फारकत केलेली आहे. जुने भुवनेश्वर, नवे भुवनेश्वर टॉऊन व भुवनेश्वर कॅपिटल.

भुवनेश्वरात ९९९९९ मंदिरे आहेत असे नाही. काही शतकापूर्वी ३०००

होती म्हणतात. आणि धडकी–पडकी मिळून सातशे आहेत. या मंदिराकरिताच भुवनेश्वराला मंदिराचे शहर म्हणतात. पृ. १२६, १४१, १४२ असे वेगवेगळ्या शहरांचे विशेष त्यांनी सांगितले आहेत.

**स्थलवर्णन / शहरांचे विशेष : 'देखणी दक्षिण'**

प्रत्येक स्थळांचे काही विशेष असतात. प्रत्येक स्थळ हे काहीतरी बोलत असते. त्याचे स्वत:चे एक स्वतंत्र व्यक्तित्व असते. एखादे निसर्गरम्य ठिकाण असो, मोठे शहर असो अगर, शांत वाळवंट असो, प्रत्येकात काहीतरी विशेष गुण असतोच. हा गुण शोधण्याचे काम ज्या चतुरस्त्र प्रवासीलेखकाला जमते तोच उत्तम ललितलेखन करू शकतो. ह्यासंदर्भात खालील मत पाहू ''प्रवासवर्णनातील वास्तव अनुभवाला लेखकाच्या संपन्न आणि समृध्द अशा व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श लाभावा लागतो, तरच त्याला वाङ्.मयीन रूप येते.''[९]

प्रवासवर्णन हे प्रवासात पाहिलेल्या घटना प्रसंगावरच लिहिले जाते. एका ठिकाणी बसून, प्रवास न करताच, कल्पना करून प्रवासलेखन केले तर ते प्रवासवर्णन होऊच शकत नाही. उलट असे प्रवासलेखन करणाऱ्याची फसगत तर होतेच त्याचबरोबर वाचकांच्याही पसंतीस उतरत नाही. शक्यतो असे लेखनही करण्यास कोणी धजावत नाही. प्रवासवर्णन हे एखाद्या प्रतिभावान व्यक्तीने केले तरच ते लेखन वाचनीय होऊ शकते. ह्यासंदर्भात डॉ. आनंद पाटील यांचे मत असे 'अतिशय व्यक्तिनिष्ठ प्रवासवर्णन करायला जड जाईल, ते वाचनीय माहितीपर, रंजक, स्थळांचे दर्शनच नव्हे तर 'फील' घडवणारे आणि वाचकाला शेवटी समृध्द करणारे असावे.''[१०] सौ. उषा पाणंदीकर यांनीही त्यांच्या प्रवासवर्णनात वरील सर्व घटकांचा अवलंब केल्याचे दिसून येते. त्यांनी प्रत्येक स्थळाची

माहितीपर अशी नोंद करून वाचकाच्या अनुभवाच्या कक्षा रूंदावून सोडल्या आहेत. जेव्हा उषा पाणंदीकर एखाद्या शहराला भेट देतात तेव्हा तेथील लोक त्यांच्याशी कशा पध्दतीने व्यवहार करतात, बोलतात, याचे बारकाईने वर्णन करतात. त्यासंदर्भात डॉ. शिरीष देशपांडे यांचे मत असे ''प्रवासवर्णनात स्थलांतर हा सगळ्यात आवश्यक घटक आहे. प्रवासवर्णन म्हणजे 'मी' च्या घेतलेल्या स्थलांतराचा अनुभव.'' [११] सौ. उषा पाणंदीकर यांना त्यांच्या आवडी निवडीला प्रत्येक स्थळानुसार मुरड घालावी लागते. उदा. दक्षिणेकडे त्या जेव्हा प्रवास करत असतात तेव्हा त्यांना चहा कुठेही मिळत नाही उलट त्यांना कॉफीच मिळते नाइलाजास्तव त्यांना कॉफीच घ्यावी लागते. प्रदेशानुसार तेथील, जेवण, सवयी, राहणीमान यामध्ये विविधता असते. त्यांच्या सवयी राहणीमान यांच्याशी प्रवासकर्त्याला मग मिळते जुळते घेऊनच प्रवास करावा लागतो. हळेबीड गावाविषयी लिहितात. हळेबीडच्या आवारात आम्ही पाऊल टाकले तेव्हा त्याने आमची पार निराशा केली होती. ते बाहेरून अतिसामान्य वाटले होते. दारातल्या बागीचा सुकून गेला होता. सर्वत्र रखरखीत, भगभगीत, कोरडे वाटत होते. मागल्या भकास उघड्या बोडक्या डोंगरावर भग्नावशेष दिसत होते. सगळे कसे पारोसे पारोसे वाटत होते. पृ. १३

श्रवणबेळगोळ हे गाव या दोन डोंगरांच्या चिंचोळ्या पट्टीत बसले आहे. मोठा डोंगर 'दोड्डा बेट्टा,' लहान 'चिकबेट्टा.' याचीच दुसरी नावे इंद्रगिरी व चंद्रगिरी मध्ये सुंदर 'बेळगोळा' म्हणजे धवलतीर्थ. श्वेत सरोवर.... पृ. २३

म्हैसूर म्हणजे पृथ्वीवरचा दागिना...... अलंकार, अगदी जडावाचा...... नकसुद. स्वच्छ सुंदर रस्ते, दोन्ही बाजूंनी बागा, फुल झाडे, रंगीबेरंगी बोगनवेली तसेच रस्त्याच्या कुशीला गुलमोहर...... कांचन शिरीष बहावा आणि अरूंद पानाची कण्हेरीची

झाडे....... चाफा बोलेना...... बोलायलाच कशाला हवे होते ? या लाल किरमिजी सफेद गुलाबी पिवळ्या चाफ्याचे हास्य बोलण्यापलीकडे होते ते शिवाचे हास्य होते. म्हैसूर म्हणजे धनलक्ष्मीचे निवासस्थान. इथे काय उणे आहे ? पाण्याचे प्रपात आहेत, त्यामुळे विद्युतशक्ती मुबलक, भरपूर. येथील सोन्याच्या खाणी, विविध बडे कारखाने त्याला श्रीमंत बनवीत आहेत. पृ. ३१.

कालिकतविषयी थोडी घृणा...... थोडी आत्मीयतासुध्दा वाटली. भारताचा शोध लावणारा वास्को दि गामाचे पांढरे पाय इथे या कालिकतला लागले. 'कालिखोन' असा उच्चार या केरळात केला जातो; पण कालिकत असे नाव एकदा चिकटलेले......... भूगोलात त्याच नावाने ओळखले जाते. पृ. ३९

केरळ म्हणजे तांबडीलाल माती, हिरवी वनराई, शेजारी निळा निळा समुद्र असलेली ३८ हजार चौरस मैलांची भूमी, पश्चिमेस निळ्या समुद्राने कवटाळलेली, पुर्वेस हिरव्या, मोरपिसी पर्वतरागांनी आलिंगन दिलेली, उत्तरेस असलेल्या पर्वतराजीस 'अनैमल' म्हणतात, तर दक्षिणेस वेलची पिकवणारा वेलची पर्वत आहे.

चेरियर, चलकुडी, पेरियर, पंपा........ या नद्यांनी समृध्द केलेले त्रावणकोर, कोचीन आणि मलबार किनारा एक करून १९५६ साली जन्माला आलेली ही पट्टी म्हणजे केरळ राज्य. पृ. ४०

कन्याकुमारीविषयी लेखिका लिहितात, भारताचा नकाशा डोळ्यांसमोर आला आणि आपण भारताच्या चिंचोळ्या टोकावर आहोत, भारतभूच्या पायांजवळ उभे आहोत, हे ध्यानी आले आणि क्षणभर उचंबळून आले. ऊर भरून आला. वाटले, केवढा उत्तुंग आपला देश ! कुठे दलदल, कुठे वाळवंट, कुठे घामाच्या धारा, कुठे उन्हाच्या झळा

तर कुठे बर्फाचा मारा. आपल्या पर्वतांची शिखरे किती प्रचंड, नद्या केवढ्या मोठ्या आणि हे तीन सागरांचे दर्शन . पृ. ६१

हैद्राबाद....... एकेकाळचे बडे संस्थान. ८२ हजार चौरस मैलांची ही निजामाची राजधानी आताही आंध्राची राजधानी म्हणून मिरवते. दहा जिल्हा तेलगू, पाच जिल्हे मराठी, तीन जिल्हे कानडी तरीही मुस्लिम संस्कृतीचा गोषा पांघरते. हिना व मजमुआ मोगरीचा सुगंध, गुखखू व पानविडा, लमाणी लोकांचे आरसे लावलेले चित्रविचित्र घागरे, पोचमपल्ली साड्या व मुसलमान स्त्रियांचे काळे बुरखे, पुरूषांच्या गोंड्याच्या लाल फैज टोप्या, सुरवार, सलतन, पांढरी लुंगी, पांढरा मलमलचा सदरा घातलेले लोक, काळे अंगूर आणि पांढरी अंडी, कबाब गोस्त आणि इडली सांभार यांची ही मिसळ. इथे कुचिपुडी नृत्यातले चाळ वाजवले जातात आणि मुसलमान वस्तीत कवालीच्या टाळ्या घुमत असतात. असे वर्णन करून हैद्राबादच्या उत्पत्तीची माहिती वर्णन करतात. पृ. ६९,७०.

मद्रास शहर..... भारतातले चौथ्या क्रमांकाचे शहर. खुशीने शेती होती. भरपूर पाणी. तांदूळ गोटा घरात आलेला, घरदार भरलेले दिसत होते. धष्टपुष्ट असे बैल सजवलेले, शिंगांना बक्षिसे खोचलेली. मद्रासच्या पॅरीज कोर्नर या गजबजलेल्या ठिकाणीसुध्दा दिसत. पृ. १०१

पाँडेचरी ही आमच्या गोमंतकासारखीच एक अभुतपूर्व वसाहत. पुर्वपश्चिम संगम. ती पाहावी असे खूप मनात होते. समुद्रकिनाऱ्यावरती पॉडी ८०० चौरस किलोमीटर पसरलेले शहर जुन्या पणजीसारखे, रस्त्यांची नावे Duma रस्ता, Anglode Notre सारखे चर्च आणि तशीच माणसे. घालून चर्चला जाणारी, बूट स्टॉकिंग घालून मिरवणारी.......विशेष थंडी नव्हती तरीही स्वेटर घालून बाहेर सरकलेली.......... नाजूक

गळ्यातल्या गळ्यात बोलणारी, जुन्या पणजीतल्यासारखीच...........

भारतात ऐश्वर्य आहे का ? पॉंडी पाहावी. दारिद्र्य आहे का ? चॅरी निरखावी अशी माहिती वर्णन करतात. पृ. ११७.

**'आज.... इथे, उद्या तिथे' मधील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, समजूती :**

मानवाच्या आदिम अवस्थेपासून आजपर्यंत प्रत्येक समाज घटकात त्या त्या समाजाची परिवर्तनशीलता चालूच आहे. नवीन रूढी, चालीरिती, अंधश्रध्दा समजुती निर्माण होतात. जुन्या लुप्त होतात. काही काळाच्या प्रवाहाबरोबर चालूच राहतात. परिवर्तन हा निसर्गनियमच आहे. पण समाजामध्ये काही परंपरा या नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ व आदरयुक्त मानून त्याचे पालन केले जाते. प्रत्येक समाजघटकाची त्याची स्वत:ची एक संस्कृती असते. जगामध्ये अशा भिन्न स्वरूपाच्या अनेक संस्कृती आहेत. काही लोप पावल्या तर काही आजही अस्तित्वात आहेत. आज भारतामध्येच विविध जातीधर्माचे, संस्कृतीचे लोक राहतात, त्यांचे वेगळेपण त्यांच्या बोलीवरून, राहणीवरून, संस्कृतीवरून, रूढी परंपरा, चालीरितीवरून सहज लक्षात येते. माणवाने असे वेगवेगळे गट तट का निर्माण केले. तो त्याचे वेगळेपण स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न का करतो. ह्याविषयी 'संस्कृतीची' व्याख्या वसंत आबाजी डहाके यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. ''संस्कृती म्हणजे समाजाची समग्र जीवनरीती; व्यक्तीने आपल्या समूहाकडून घेतलेला सामाजिक वारसा; विचार–भावना–श्रध्दा यांची सरणी; बाह्य पर्यावरण आणि इतर लोक यांच्याशी जुळवून घेण्यासाठी वापरात येणाऱ्या तंत्राचा समुच्चय; सामाजिक संघटना, धर्म आर्थिक व्यवहार या सर्वांचा संस्कृतीत समावेश होतो; संस्कृती म्हणजे सामाजिक वारसा, परंपरा, जगण्याच्या संदर्भात उभे केलेले आदर्श, मुल्ये; नियम; आपल्या भोवतीच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यातल्या अथवा एकत्र

राहण्यातल्या समस्या सोडवण्याचा मार्ग; वर्तनाविषयीच्या अंतर्गत संबंध असलेल्या कल्पना व प्रतीके यांचा समावेश संस्कृतीत होतो; संस्कृतीमध्ये मानवनिर्मित उपयुक्त वस्तू, कलावस्तू, श्रध्दा, चालीरिती, रूढी, रितीरिवाज, भाषा, नितीनियम, धर्म, मूल्ये, तंत्रज्ञान, दृष्टिकोन या सर्वांचा समावेश केलेला आहे. संस्कृती हे समाज–संक्रमित वर्तन असते.''[१२] उषा पाणंदीकरांना प्रवासात वेगवेगळ्या समाजाची, संस्कृतीची लोकं भेटली. प्रत्यक्ष त्यांनी त्या समाजातील रूढी, चालीरीती पाहिल्या. तेव्हा आपल्या भारतीय समाजरचनेत किती वैविध्य आहे याची त्यांना जाणीव खऱ्या अर्थाने झाली. आपला देश किती विविधतेने नटला आहे हे प्रत्यक्ष उषा पाणंदीकर या प्रवासात अनुभवत होत्या. काही परंपरा रूढी समाजाला घातक, मारक कशा होत्या व काही परंपरा चालीरिती त्यांच्या संस्कृतीत कशी सौंदर्याची भर घालीत होत्या. जीवन कशा सुखावह व आनंदी करीत होत्या या दोन्ही घटकाचा विचार त्यांनी या प्रवासवर्णनात मांडला आहे. प्रदेशानुसार चालीरितीमध्ये कसे वेगळेपण , वैविध्य आहे हे त्यांनी अचुक टिपले आहे. या पुस्तकात आलेल्या रूढी, अंधश्रध्दा, परंपरांचा विचार करू.

हरिव्दारमध्ये बरेच लोक गंगेच्या पात्रात नाक धरून बुडी मारत. आपण जे काही पाप केले ते तोंडाने म्हणायचे व गंगेत बुडी मारायची म्हणजे पाप गंगार्पण होते. जी वाईट गोष्ट आपल्या हातून झाली तिची टोचणी आपल्या मनात रहात नाही. म्हणजे मग आपल्याला पश्चाताप नाही. निसर्गाच्या भव्य वेदीवर समोरच्या पर्वतांसमोर गंगामाईला साक्ष द्यायची......जणू आईकडे चूक कबूल करायची......लेखिका म्हणतात, किती सुंदर समंजस कल्पना ही! पृ. १२

केदारनाथ म्हणजे महादेव येथेच एक गढवाली जमात आहे. ती दुर्योधनाला

पुजते. दुर्योधनाला नायक मानणारी. तो कसा सरळ मार्गी सुस्वभावचा होता हेही लेखिकेने वर्णन केले आहे. पृ. २४

गढवाल येथे बहुपती प्रथा चालते. एका स्त्रीला चार-चार पाच-पाच पती. एकापेक्षा जास्त पती असतात. पृ. ३६

काश्मिरात बेल तुळस मिळत नाही. तेव्हा इथे देवाला 'धुप्पी' ची फुले व पाने वहायची. पृ. ८८९

स्वातंत्र्यपुर्वकालात सती जाणाऱ्या स्त्रीचे एक चित्र आहे. हे व्हिक्टोरिया मेमोरियलमध्ये आहे. या स्त्रिया स्वखुशीने सती जात नव्हत्या. एखादी स्त्री नाकारीत असे. तिला उपाशी ठेवून भांग पाजीत. व हातपाय बांधून तिला त्यांची घरची माणसे चितेवर ढकलून देत. ती जर बाहेर येण्याचा प्रयत्न करू लागली तर तिला बांबूनी ढोसत व तिच्या किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून कर्कश भेसूर ढोल बडविले जात. पृ. १००

दिल्ली जवळ झुंझनु गावी एक स्त्री सती गेली होती. तिचे देऊळ उभारण्यात आले. मिरजेत एका स्त्रीने नवऱ्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आप खुषीने केशवपन केले.

पंजाबात अजून 'करवॉ चौर' व आपल्याकडील 'वट सावित्री' व्रत ही कमकुवत मनाची लक्षणे नाहीत का ? असा खडा सवाल लेखिका विचारतात. पृ. १०१

दुर्गादिवीला नैवेद्य म्हणून काय दिले जाते. हेही वर्णन केले आहे. ती सर्वभक्षक आहे. तिला रेडा बोकडच हवा असे नाही. तिला पक्षी चालतो. मत्स्य ती वाईट म्हणत नाही. हरण, कृष्ण काळवीट, घोरपड, उंट...... तिला पूर्वी माणूस देत असत. आताही दिला तर तो ती आवडीने खाईल.... पण माहेरवाशीण सखू असते चोचल्यांची तिला रॉशमोलाय गोड

ढमक लागते. रॉशगुल्ला तोंडात घातल्याशिवाय तिचे गाल फुगतात. संदेशातलं दही तर तिच्यासारखे कुरकुरते. दिलेली साडी तिला आवडत नाही. आणि पोलक्याचा रंग भडक वाटतो. पण या चोखंदळपणाचे बाळीचे कौतुकच जास्त होते. पृ. ११२.

दुर्गा ही यशाची देवता. स्त्री हे देवीचे रूप. देवीला एक फूल कमी पडले तर दुर्गेला स्वत:चे नयनकमल वाहिले होते. पृ. ११३.

देवाच्या पायावरचे तीर्थ हे देवासारखे शुध्द असते का ? आपण पंचामृत तरी कसे करतो ? थोड्या देवळात पायावर केळी घासतात...... त्यात मध तूप घालतात व तो काला प्रसाद म्हणून वाटतात. पृ. १३८.

**'देखणी दक्षिण' मधील रूढी परंपरा, अंधश्रध्दा :**

''समाज कृतिप्रवण व्हायचा असेल तर सातत्याने प्रबोधनाची प्रक्रिया सुरू असावी लागते. या प्रबोधन प्रक्रियेत साहित्याचा सहभाग फार मोठ्या प्रमाणात असतो. संस्कृतीची जडणघडण अशा प्रबोधन प्रक्रियेवरच अवलंबून असते, हे लक्षात घेतले म्हणजे संस्कृतीच्या जडण–घडणीत साहित्याचे महत्त्व किती आहे हे स्पष्ट होईल''[१३] असे मत सदा कऱ्हाडे मांडतात.

खरोखरच साहित्याचे योगदान फारच मौलिक असे आहे. समाजामध्ये ज्या अनिष्ठ रूढी चालीरिती, परंपरा आहेत त्या प्रकाशात आणण्याचे त्याला वाचा फोडण्याचे काम साहित्य करित असते. एक प्रकारे या अंधश्रध्दा रूढींना खीळच बसते. भारतामध्ये वेगवेगळ्या प्रदेशामध्ये कोणत्या अंधश्रध्दा आहेत, रूढी आहेत, त्या कशा पध्दतीच्या आहेत याची तपशीलाने माहिती साहित्यातून मिळते. त्यामुळे समाजाची जनजागृती होते व समाज सुज्ञ व विचारशील व परिवर्तनशील बनतो. साहित्यामुळेच समाजामध्ये परिवर्तनाची

वाढ होऊ लागते. अनिष्ठ प्रथेला बऱ्याच प्रमाणात आळा बसतो.

साहित्यामुळे संस्कृतीचे रक्षण होते. तसेच, सण उत्सव याचे अस्सल रूप लोकांना समजून येते. साहित्यामुळेच प्राचीन कलामध्ये संस्कृती कशी होती आचार विचार कसे होते हे कळून येते. ह्या संदर्भात सदा कऱ्हाडे लिहितात ''साहित्य हे संस्कृतीचे 'संरक्षण करते त्याचप्रमाणे संस्कृतीच्या 'संवर्धना' तही साहित्याचा फार मोठा भाग असतो. संरक्षण आणि संवर्धन या दोन प्रवृत्तींमुळेच मानवी जीवनाची प्रगती होऊ शकली. म्हणून मानवी जीवनाच्या प्रगतीप्रक्रियेतही साहित्याला महत्त्वाचे स्थान आहे.''[१४] 'देखणी दक्षिण' या पुस्तकांमध्येही उषा पाणदीकरांनी भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांमधून जो प्रवास केला त्यावेळी त्यांना ज्या संस्कृती दिसून आल्या त्यांच्यातील अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, पोशाख, खानपान यांचेही त्यांनी विशेष वर्णन केले आहे. त्यामुळे भारतातील वेगवेगळ्या भागातील संस्कृतीचे दर्शन, वेगळेपण या पुस्तक वाचनाने घडू शकते. या पुस्तकात ज्या अंधश्रध्दा, रूढी–परंपरा उषा पाणंदीकरांनी नमूद केल्या आहेत त्या खालीलप्रमाणे. गोमटेश्वराविषयीची लोकांची समज म्हणजे याच्या डोक्यावरून कुठलाच पक्षी जात नाही, अशी एक समजूत आहे. आणि याच्या पुढे कुठलाच देव उभा राहू शकत नाही असा एक समज आहे.........पृ. २५.

पुरूष हा उपरा, स्त्रीही धरतीप्रमाणे चिरंतन जन्मदात्री, ही जुनी मातृसत्ताक पध्दत आचरलेले नायर, आपल्या येरवाडातील मुरूमुक्कातायम् हा द्राविडी सांप्रदाय ही दक्षिण पध्दती अजून आचरतात, तर आर्यांचे वंशज नंबुद्री पाद नंपुतिरी ब्राम्हण आपल्या 'इलम' या पितृसत्ताक पध्दतीचा तोरा मिरवीत असतो. फक्त थोरला मुलगा हाच संपत्तीचा वारस. त्याला दौलतच नव्हे तर सर्वाधिकार, मोठा मुलगा हा हिरा, बाकीचे कचरा. लग्न

बायकोसुध्दा मोठ्यालाच. बाकीच्यांना लग्नाचा अधिकार नाही. त्यांनी पाहिजे तर वहिनीशी 'संबंधम' ठेवावेत. नाहीतर नायर स्त्रीला जवळ करावे. दोन साड्या व एक तेलाचा डबा वर्षाकाठी दिला की झाले. जबाबदारी संपली. हात झटकून कुशीला व्हावे. भिकाऱ्यांना ओकाऱ्या कशाला ?

या लोकांना सोवळे–ओवळे खूप. तसेच रोटी–बेटी संबंधात खूप कडवे. रोज चालते, पण पेज चालन नाही. पृ. ४१.

काझिकोडे ही सामुद्रिन आमोरिन राजांची राजधानी. या घराण्यात युवराज वारस ठरत नाही तर युवराज्ञी 'राजा' होते. सर्वात मोठी अम्मा म्हणवली जाते. आत्याकडे सर्वात वडील मुलीकडे सर्वाधिकार असतात. राज्य अथवा पौरोहित्य हे मुलाकडे नाही तर भाच्याकडे जाते. सुना पाहुण्या ठरतात आणि जावई सासुरवास भोगण्याकरिता घरात आणले जातात. 'थरवाड' पध्दतीने राज्य स्त्रीच्या परंपरेने चालत असे. पृ. ४५.

या सामुद्रिन घराण्यात आणखीन एका प्रथेचा उल्लेख लेखिका करतात. प्रत्येकाने बारा वर्षे राज्य करावे. नंतर स्वतःचा शिरच्छेद करून घ्यायचा. ही रीत अमानुष होती, अमानवी होती, रानटी होती; पण भवितव्याच्या दृष्टीने अचूक होती. जीवनाचा अतुट मोह, संसाराची अतृप्तता दूर करणे आवश्यक असते. निसर्गातसुध्दा हेच चालते. केळीला घड आला की ती कापून काढायची असते. फळ धरल्यानंतर फुलाने झाडाची कूस सोडायला हवी, जुन्याने नव्याला जागा द्यायला हवी. सर्जनाला मरणाची आवश्यकता आहे, हे त्यांना पटले होते. पृ. ४६.

कुचेचा उत्सव व त्या मंदिराविषयीची प्रथा नमूद केली आहे. अस्पृश्यता हा आपल्या समाजजीवनातील मोठा कलंक आहे. अजून त्याला आळा घालता आला नाही.

इथे या मंदिरात महात्मा गांधींनी उपवास करून अस्पृश्यांना प्रवेश दिला होता; पण तो त्या वेळेपुरताच असावा. पण काही वेळा अस्पृश्यता ही शिवी कधी ओवी बनते. कलंक हा टिळा मानला जातो. पृ. ५१

या दक्षिणेकडच्या साऱ्याच देवळांत एक वस्त्र व वर उपवस्त्र घालून आत जावे लागते. पृ. ५३.

कुवागम नावाच्या खेड्यात चैत्र पौर्णिमेला लग्ने होतात. इथल्या 'आरावण' च्या मंदिरात हे लोक एकत्र येतात. अर्थात हा मोफत खेळ पाहायला गावातले रिकामटेकडे, गुलछबू, टारगट आलेले असतात. तृतीयपंथी विवाह पध्दतीचे वर्णन करून त्या विवाहप्रथेचे कारणही दिले आहे. पृ. ५७.

मलबारी स्त्रीला जेवढे प्रियकर, तितका तिला मान. ही जवळची देख न घेता ही कोवळी वधू गलथान, दिलेला शब्द न पाळता येणाऱ्या एका भणंग जोगड्याकरिता कल्पांतापर्यंत वचनबध्द राहते. हे फक्त स्त्रीच करू जाणे. तीच करू शकते. पृ. ६४.

कामाला सुरूवात करण्यापुर्वी मन एकाग्र करण्यासाठी नमाजाची गरज आहे. या प्रार्थनेला 'फजर' नमाज म्हणतात. जेवल्यानंतर सुस्ती येऊ नये म्हणून 'जोहरा' नमाज पढावा लागतो. तिन्हीसांजेला शीण घालविण्याकरिता 'असर' नमाजाची गरज असते आणि शांत झोप लागावी म्हणून परमेश्वराची स्तुती करणे याला 'मगरीब' चा नमाज म्हणतात. पृ. ७६.

तिरूपतीला केस अर्पण केले जातात. त्याविषयीची प्रथाही लेखिका नमूद करतात. पृ. ९३.

'पानगुनी' म्हणजे चैत्र महिन्यात हा विवाह समारंभ साजरा होतो. मोठा थाट

असतो. कित्येक जोडपी पुजली जातात. देवत्वाची वलये आली म्हणजे किती यावीत ! इथे धनप्राप्ती होते, पुत्र प्राप्ती होते............ मागेल ते मिळते. पृ. १०९. भारतामध्ये प्रदेशानुसार कशा वेगळ्या प्रथा, रूढी समजूती आहेत यांचे वास्तव व तटस्थपणे एकत्रीकरण लेखिकेने केले आहे.

**'देखणी दक्षिणमधील सण व उत्सव :**

सौ. उषा पाणंदीकर या दक्षिणेकडे जेव्हा प्रवास करत होत्या तेव्हा त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे सण व उत्सव पाहण्यात आले. ते सण, उत्सव त्यांनी पाहून विसरून गेल्या नाहीत. तर त्याचे पुनरुज्जीवन त्यांनी आपल्या या पुस्तकात केले. दक्षिणेकडे सण कसे साजरा करतात. या उत्सवाच्या मागे काही दंतकथाही आहेत त्याही त्यांनी सांगितल्या आहेत. सण साजरे करताना त्याचे वेगळेपण त्यातील वैविध्य बारकाईने टिपले आहे. प्रत्येक समाज घटक आपल्या संस्कृतीमध्ये आचार विचारामध्ये बंदिस्त असतो. त्यांच्यातील सण, उत्सव, रितीरिवाज यामध्येही वेगळेपण असते. ह्या संदर्भात डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात ''कोणत्याही समाजात भौतिक आणि अभौतिक अशी व्दिस्तरीय स्वरूपाची संस्कृतीव्यवस्था नांदत असते. साहित्यव्यवस्था हा त्या समाजाच्या अभौतिक संस्कृतिव्यवस्थेचा एक भाग असतो. त्यामुळे त्या समाजाच्या भौतिक आणि अभौतिक संस्कृतिव्यवस्थेचा संदर्भ टाळून साहित्याचा अभ्यास करता येत नाही.''[१५] उषा पाणंदीकर यांनी सुध्दा दक्षिणेकडील प्रवास करत असताना समाजाच्या भौतिक आणि अभौतिक संस्कृतिव्यवस्थेचा आपल्या पुस्तकात समावेश केला आहे.

साहित्य हे संस्कृतीचे संरक्षणच करीत असते. एखाद्या कालावधीमध्ये जे साहित्य निर्माण होते. त्या कालावधीमधील संस्कृतीच्या बऱ्याच छटा साहित्यात

उमटलेल्या असतात. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर अशा प्रकारचे साहित्य हे ऐतिहासिक दस्तऐवज काही अंशाने का होईना म्हणावे लागते. कारण समाज संस्कृतीचे प्रतिबिंब थोड्याबहूत प्रमाणात हे साहित्यात पडलेले असते.

क्रोचेच्या मते ''खरी कलाकृती मनात असते. ज्या बाहेरच्या गोष्टीला आपण सामान्यत: कलाकृती म्हणतो ती खऱ्या अर्थाने कलाकृतीच नव्हे.'' [१६] क्रोचेच्या मताला सहमती दर्शवून त्यांच्या विधानात सत्य दडलेले आहे हे समजते. याबाबतीत पाणंदीकरही सुटल्या नाहीत. प्रवासात त्यांना अनेक घटना प्रसंग पाहण्यात आले असतील, वेगळे अनुभव आले असतील. त्यांच्या मनातसुध्दा फारच वेगळ्या स्वरूपाची कलाकृती दडलेली असूनसुध्दा प्रत्यक्षात त्यांनी काही ठराविकच घटना, प्रसंग अनुभवांना प्राधान्य देऊन ही कलाकृती साकार केली आहे. क्रोचेच्या मताप्रमाणे मनातील कलाकृती प्रत्यक्ष साकार करण्यात बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. लेखकाला समाजाच्या नितिमुल्यांचा विचार करूनच आपले लेखन करावे लागते. क्रोचेच्या विधानात सत्यता जरी असली तरी लेखकाला समाजाचे भान पाळूनच आपल्या कलाकृतीला आकार द्यावा लागतो.

म्हैसूरचा प्रसिध्द दसरा महोत्सव लेखिकेने पाहिला. त्याचेही वर्णन केले आहे. म्हैसूरचा अंबाविलास राजवाडा परत झगमगला होता. सजवलेल्या जरी पटक्यांच्या हत्तीवरून डुमडुमू नगारे वाजवले गेले होते. सनई-चौघडा घुमला होता. खाशे स्वारीची मिरवणूक निघाली होती. शमी वृक्षाची पूजा झाली होती. सोने लुटले होते. इडली-उतप्पाची रूची वाढली होती. रस्ते फुलून आले होते. रेशमी चौकडीच्या कांजिवरम साडी व हिऱ्याच्या कुड्या घातलेल्या व दोन्ही नाकपुड्यांत चमक्या असलेल्या अम्मा, कानांत लालखडे व ठेवणीचा रेशमी शर्ट व धोतर नेसलेल्या अप्पाकडे शीळ घातल्यासारख्या कुजबुजत व ते

गडगडाटी हसत.

दसरा म्हणजे विजयादशमी. सत्त्याने असत्त्यावर मिळविलेला विजय. कालीने या दिवशी राक्षसांचा संहार केला. पांडवांनी या दिवशी शमीच्या झाडावरून अस्त्रे खाली घेतली. बुध्द गौतमाने या दिवशी अखेरचा उपदेश केला. जैन श्रमणाच्या व्रताची सांगता याच दिवशी होते. अशी या दसरा महोत्सवाची महती लेखिका देतात. पृ. ३२.

'ओणम्' या फुलांच्या उत्सवाच्या दिवसात बळीराजा वर्षातून एकदा येतो. दिवळीत तेल–वात घालून वाट पाहणाऱ्या आपल्या लेकरांना भेटतो. पिवळी भात–शेती..... अमृताचे कलश घेऊन मिरवणारे कल्पवृक्ष....... पिवळे लाल झेंडूचे गेंद पाहून खूष होतो...... आपली प्रजा संतुष्ट आहे, हे पाहून आपणही संतुष्ट होतो. पृ. ४१.

कुचेचा उत्सवही पाहण्यात आला. कुचेला म्हणजे सुदामा. श्रीकृष्णाचा हा गरीब बालमित्र एकदा त्याला भेटावयास आला व श्रीकृष्ण त्याला प्रेमाने भेटला. त्या प्रित्यर्थ हा उत्सव......... येथील देऊळ आमोरिनच्या पंजाखाली होते. आमोरिनच्या विश्वस्तामार्फत या देवालयाचा कारभार चालतो. पृ. ५१.

त्रिच्युर जिल्ह्यात 'क्रोडलंगर' च्या पारलम या गावात एक जत्रा भरते. तिथे १७ दिवस हा उत्सव चालतो. अस्पृश्य लोक बेफाम, बेभान होऊन जथ्याने नाचत, गात धुंद होऊन येतात. हे लोक दारू प्यालेले असतात. त्यांनी अफू घेतलेली असते. त्यांना शुध्द नसते.

देवीने दारूक राक्षसाचा वध केला तेव्हा देवी मानसिक रूग्ण झाली होती. तेव्हाही अशीच बेभान होऊन बेताल नाचत सुटली होती.

तिला खूश करण्यास, तिला समजावण्यास हेही स्वत:ला भाल्याने टोचून

घेतात, तलवारीने जीभ फाळून घेतात. कान काटून काढतात, नाक कापून टाकतात, डोळ्यांना जखम करून घेतात. त्यांच्या तोंडात अश्लील गाणी असतात, घाणेरडे अंगविक्षेप हे असे खेळ करीत हा तांडा नाचत, झिम्मा खेळत निघून जातो. अशी या उत्सवाची माहिती लेखिका ऐकून वर्णन करतात. पृ. ५१, ५२. शिव व मिनाक्षीच्या विवाहाविषयीही माहिती लेखिका देतात. चैत्र पौर्णिमेला कदंब वृक्षाखाली त्यांचा विवाह झाला. भाद्रपद महिन्यात जेव्हा मूळ नक्षत्र असते, तेव्हा हा 'अवनिमुलम' विवाह उत्सव साजरा होतो. ज्या कदंब वृक्षाने हा विवाह पाहिला, त्या साक्षीदाराचा फक्त आज बुंधा शिल्लक आहे. या विवाह उत्सवाचे सुक्ष्मपणे व तपशिलवार माहिती लेखिका नमूद करताना दिसतात. पृ. ६७, ६८.

**'देखणी दक्षिण' मधील जीवनभाष्य :**

लेखक जेव्हा समाजात वावरत असतो तेव्हा समाजामधून त्याच्या रोजच्या दिनक्रियेतून तो रोज शिकत असतो. त्यातूनच त्याची अनुभव संपन्नता वाढते. त्याच्या विचारामध्ये प्रगल्भता येते. त्याच्या वैचारिकतेत बदल घडून येतो. त्याचा समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळाच असतो. तो त्यावर विचार, मनन, चिंतन करतो. त्यातूनच त्याला जीवनाचा अर्थ कळतो. जीवनातील विविध पैलू त्याला समजून येतात. जेव्हा त्याला एखाद्या प्रसंगाला सामोरे जावे लागते वा एखादा अनुभव येतो त्यावेळी नकळतच त्याच्या चिंतनशिलवृत्तीमुळेच तो जीवनाविषयी आपले विचार सद्सद्विवेकबुध्दीने मांडतो. म्हणूनच रा. भा. पाटणकर म्हणतात, ''आत्मविष्कार म्हणजे विश्वातील चैतन्यतत्वाचा आविष्कार होय.[१७]

जीवनाच्या वेगवेगळ्या घटकावर प्रतिभाशाली लेखक आपल्या अनुभवाच्या जोरावर भाष्य करू शकतो. कारण अनुभवातूनच तो जीवनभाष्य करीत असतो.

नग्नता ही बीभत्स आहे का ? नसावी, नाही. निसर्गाचे आदिम रूप. जगात येणारा व इथून शेवटचा निरोप घेऊन जाणारा माणूस कपडे पेहनीत नाही, नसतो. पक्षी काही आंगडे – टोपडे घालून येत नाहीत आणि पशूही शेवटचे कफन घालून जात नाहीत. मग माणूस एका धाग्याकरिता ही नाटके का करतो ? दु:खाचे शंभर धागे बांधून का घेतो ? असे भाष्य या दोन मित्रांच्या प्रसंगावरून त्या निमित्ताने करतात. पृ. २६.

अस्पृता हा आपल्या समाजजीवनावरील मोठा कलंक आहे. अजून त्याला आळा घालता आला नाही. पृ. ५१.

स्त्रीच्या बाबतीत केलेले भाष्य. दान पडलं नाही म्हणून सारिपाट उलथून असा उधळून टाकायचा ? आपण स्त्रियांनी ही स्वप्ने पाहूच नयेत. मग ती फोल होण्याचे दु:ख नाही आणि साफल्याचे मोलही मोजावे लागत नाही. – असे भाष्य कन्याकुमारीकेला पाहिल्यानंतर करतात. पृ. ६४.

पण आम्ही पाहिले, माणसांसारखीच माणसे होती. नादान, निर्बुध्द, निर्दय, राजस, रागीट, कठोर, कोमल, कुर्रेबाज, शहाणी, समंजस पण क्रूर कुणीच नव्हते. हे हैद्राबादच्या लोकांविषयीचे भाष्य होय. पृ. ७१ पण माणूस यशाचे एक सोपान चढला की त्याला वरचे सोपान चढावेसे वाटते. वरचे आकाश त्याला भूल घालते. निळाई बोलावू लागते. त्याला आस लागते, प्यास लागते, ध्यास लागतो. पृ. ८६.

दया, क्षमा, शांती व औदार्य हे गुण देवाजवळ असतात. देवाजवळ देवत्व असते आणि दानव हा दानव असतो. त्याच्याजवळ माया, मोह, मत्सर, अहंकार, द्वेष हे असतात. त्यांची अदलाबदल होते आणि मग देव हा देव राहत नाही आणि दानव हा दैत्य उरत नाही. पृ. १०८.

परिस्थिती माणसाला घडवते की माणूस परिस्थितीला हा वाद अलाहिदा आहे. जीवनाचे वस्त्र निरनिराळ्या धाग्यांनी विणलेले असते व विचित्र धाग्याचा गुंताडा झाला. मनात वासना दडवलेला...... नैसर्गिक वासना कोंडून ठेवणारा माणूस मग माणूस राहत नाही. तो पशू होतो, याकरिता असा निचरा व्हावा लागतो. पृ. १३८, उरळी जमातीच्या बाबतीत वरील भाष्य लेखिका करतात. ह्या जमातीत आपल्या बायकांची अदलाबदल केली जाते. आपल्या इच्छेनुसार कधीही मिळविता येते. तसेच तिच्या इच्छेने तिला परत येता येते.

**प्रवास हाच अनुभवाचा घटक :**

प्रवासवर्णनासाठी आवश्यक अन् महत्त्वाचा घटक म्हणजे अनुभव होय. प्रवासात लेखिकेला रोज नवा अनुभव मिळत असे. हा प्रवास सुरू असताना प्रत्येक गोष्टीकडे सुक्ष्म व निरीक्षण नजरेने पाहत असत. एका गृहिणीने केलेला प्रवास कौतुकास्पद असाच आहे. प्रदेशानुसार त्यांना वातावरणात बदल जाणवत होता. उन्हाळा असो पावसाळा असो अगर कडक थंडी पुढील प्रवासासाठी लेखिका सज्ज असत. प्रवासात त्यांना योग्य अशी त्यांची राहणे अन् जेवणाची सोय होत नव्हती. तरीही लेखिका अशा प्रसंगांना जुळवून घेत. थोड्याशा अस्वस्थ होत. प्रवासात त्यांना हरतऱ्हेची लोक भेटले. प्रत्यक्ष त्यांना जवळून पाहण्याचा, संवाद साधण्याचा योग आला. प्रदेशानुसार त्यांना भारतातील वेगवेगळ्या संस्कृतीचे दर्शन झाले. त्या त्या संस्कृतीचे लोक, त्यांच्यातील रीतिरिवाज, श्रध्दा, अंधश्रध्दा, त्यांचा पोशाख त्यांचे राहणीमान, खानपान हे जवळून पाहण्यात आले ते प्रवास केल्यामुळेच.

**वास्तव हेच अनुभव विश्व :**

प्रवासवर्णन म्हणजे प्रवासात जे पाहिलं अनुभवलं तसेच ऐकले याचा

वास्तवाच्या पातळीवर कलात्मक लेखनरुपाने केलेला सुमेळ होय. प्रवासात ज्या गोष्टींवर लोकांचा विश्वास बसणार नाही, अथवा काही प्रसंग जे कधीही पाहण्यात नसतात असे प्रसंग जे वास्त्वरूप धारण करून प्रवासकर्त्याच्या समोर घडतात त्याचेच चित्रण लेखिका करतात. प्रवासात लेखिकेला काही चांगले व वाईट प्रसंगानाही तोंड द्यावे लागले. लेखिकेने ज्या तिर्थस्थळांना भेटी दिल्या तेथील तिर्थस्थळांचे महत्त्व आख्यायिका दंतकथा यांच्या सहाय्याने सांगण्याचा प्रयत्न तर केला आहेच. पण त्या तिर्थस्थळावर सध्या कायस्थिती आहे हेही सांगण्याचा वास्तव प्रयत्न केला आहे. काश्मिरकडील बर्फमय वातावरण तेथील दलसरोवर, तसेच गृहनौका, लोकांचा चतुरपणा, तेथील सफरचंद, स्ट्रॉबेरी, प्रत्येक घटक त्यांनी वास्तवाच्या पातळीवर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बार्गीचे केलेले वर्णन, किरकोळ कारणावरून होणारी भांडणे, मारामाऱ्या, खून यांचे जवळून दर्शन झाले. तसेच खजुराओ येथील कामप्रेरणेने उत्तेजित करणारी शिल्पे हा अनुभव, तसेच कन्याकुमारीकडे केलेले गमन त्यांना कसे उंचबळून येते याचे वास्तवदर्शी लेखिका आपल्या दोन्ही प्रवासवर्णनात वर्णन करताना दिसतात.

**निरीक्षणशक्तीची कसोटी :**

प्रवास हा प्रवासकर्त्याला उघड्या डोळ्यांनी सतत करावा लागत असला तरी, नुसता प्रवास करून चालत नाही. प्रत्येक भौगोलिक स्थळांकडून काहीतरी घेण्याचा प्रयत्न करावा लागतो. प्रत्येक भौगोलिक प्रदेश हा त्याच्यावेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी युक्त असा असतो. प्रवासकर्ता लेखक त्या प्रदेशाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो यावर त्याचे लेखन अवलंबून असते. निरीक्षणशक्ती हा महत्वाचा घटक असून लेखकाची मात्र याबाबतीत कसोटी लागते. प्रवास जेव्हा सुरू असतो तेव्हा चित्रपटाप्रमाणे वेगवेगळे घटना प्रसंग

डोळ्यांसमोरून सतत पुढे जात असतात. या सर्व घटना प्रसंगातून अनुभवातून लेखकाच्या मनाला ज्या प्रसंगांनी स्पर्श केला अशांनाच तो प्राधान्य देतो. सर्वच प्रसंग त्यांना जवळून व बारकाईने पाहता येतात असेही नाही. तसेच लेखिकेला प्रवासाच्या स्मृतीसाठी नोंदवहीचाही वापर करावा लागतो. तर कधी कॅमेरा वापरावा लागतो. मग पाहिलेले प्रदेश लेखनावेळी डोळ्यासमोर जिवंतपणे आहे असे उभे राहू लागतात.

**प्रदेशाचे जीवंतचित्र :**

प्रवास हा विशिष्टस्थळांनाच केला जातो, जे प्रेक्षणीय आहे. संस्कृतीने युक्त आहे. एखाद्या प्रदेशाचे त्याचे म्हणून काही विशेष असे वेगळेपण असते. तेच लेखक आपल्या लेखनीव्दारे प्रवासवर्णनात बंदिस्त करण्याचा प्रयत्न करत असतो. प्रत्येक प्रदेश हा प्रवासकर्त्याला बोलत असतो, त्याचे विशेष वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न करीत असतो, पण हे कळण्यासाठी लेखकाच्या जवळ कलात्मक मन असायला हवे असते. काश्मिरकडील बर्फाच्छादित प्रदेश असो, बागींचे राज्य असो, खजुराओ मंदिर असो, अगर कन्याकुमारी असो, नाहीतर कलकत्ता गजबजलेले शहर असो ह्याची मांडणी करण्याची कसोटी लेखकाच्या कलात्मकतेवर अवलंबून आहे. प्रत्येक घटकाला तो कितपत न्याय देतो यावरच त्या स्थळाचे कलाकृतीतील स्थान ठरत असते. सौ. पाणंदीकरांनीही पाहिलेल्या प्रत्येक स्थळांना बोलके करण्याचा प्रयत्न केला आहे. खजुराओ येथील मंदिर शिल्पे प्रत्यक्ष वाचकाबरोबर संवाद साधतात असा अनुभव येतो तर काश्मिरकडील वर्णन सुखद अनुभव देतो, तर बागींच्या राज्यातून प्रवास वाचताना थरकाप उडवितो. कलकत्त्याचे वर्णन वाचताना आपल्या आसपास किती गोंगाट, गजबजाट आहे याचा त्रास होऊ लागतो. कन्याकुमारीचे वर्णन वाचताना वाचक एकदम भावनीक व भावविवश होतो. प्रत्येक

घटनाप्रसंग जीवंत होऊन बोलू लागतो.

**पारदर्शकता :**

सौ. पाणंदीकर यांनी दोन्ही पुस्तकामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी तटस्थपणे प्रत्येक घटनाप्रसंगावर लेखन केल्याचे निदर्शनास येते. त्यांनी त्यांच्या लिखानात कोणताही आडपडदा ठेवलेला दिसून येत नाही. त्यांचे लेखन हे मराठी साहित्याला उत्तम योगदान ठरले असून, एक गृहिणी म्हणून त्यांनी प्रवासात त्यांना जे जे प्रसंग, संकटे ओढवली त्याचेही त्यांनी पारदर्शक चित्रण करण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. एखादे निसर्गचित्रण, शिल्पकला, आख्यायिका, दंतकथा, स्थलवर्णन, समाजचित्रण करत असताना त्यांनी पारदर्शकता हा महत्त्वाचा घटक लेखनात बाणवल्याचे दिसून येते. प्रवासवर्णन जर पारदर्शक नसेल तर, एखादा विशिष्ट हेतू ठेवून जर लेखक लेखन करीत असेल तर वाचकांची दिशाभूल होण्याची शक्यता जास्त असते.

**प्रगल्भता :**

एका उत्तम साहित्यिकात ज्या गुणांची मिश्रण असायला हवी त्यापैकीच प्रगल्भता हा गुणविशेषही असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लेखिकेच्या लेखन प्रपंचात हा गुण विशेषत्वाने जाणवतो. त्या कधी कवयित्री बनतात, कधी इतिहासकार, कधी भाष्यकार तर कधी पुराणवस्तूसंशोधक तर कधी समाजप्रबोधनकार बनतात. ह्या सर्व गुणधर्माच्या माध्यमातून त्यांची स्वतःची एक विचारशैली निर्माण झाली आहे. त्या एका समाज शिक्षकाचीही भूमिका आपल्या ह्या प्रवासवर्णनातून वठवून नेतात. त्याचा वाचकाला कितीही बोजडपणा वा क्लिष्टता जाणवत नाही. त्यानी समाजाच्या विकृतीचेही जळजळीत वर्णन करून नकळतपणे त्यांनी त्यावर टीकेची झोड उठवून प्रखर वास्तवावर हासूड ओडण्याचे

काम केले आहे. तर कधी त्या आईच्या मायेनेही समाजातील जीवनवास्तवावर आपले मत व्यक्त करतात. कधी त्या सोळा वर्षाच्या अल्लड प्रेयशीचे रुप धारण करतात तर कधी त्या निरागस बालकाप्रमाणे निसर्गवर्णन करताना वाटू लागतात. इतक्या त्या बालिश वाटतात. एखादा भावपुर्ण प्रसंग वर्णन करताना वाचकांच्या भावनेला आव्हान करतात. हे त्यांच्या प्रगल्भ लेखकाचे गुणविशेष दिसून येतात हे खरे.

**लेखिकेचे प्रतिभावान मन :**

पाश्चात्य विचारवंत लोंब्रोसो याने म्हटले आहे, प्रतिभा ही वेडाची बहीण आहे. खरोखरच खरा कवी हा त्याच्याच धुंदीत जगत असतो. त्याचे विश्व व व्यावहारिक जग यात बराच फरक असतो. लेखिकेच्याही व्यक्तिमत्वात विशेषत्वाने जाणवणारा गुण म्हणजे प्रतिभाशक्ती हा होय. लेखिका जेव्हा प्रवास करतात एखाद्या ठिकाणाचे निसर्गचित्रण व हृदयस्पर्शी प्रसंग पाहतात तेव्हा त्या फारच भाऊक होतात. त्यांच्यातील कविताशक्ती जागृत होते. त्या प्रवासवर्णनात इतक्या तल्लीन होऊन जातात की, स्वत:चे अस्तित्व विसरून जाऊन त्यांच्या ओठातून काव्याच्या ओळी बाहेर पडू लागतात. काही घटनाप्रसंग लेखिकेच्या कवीमनाला आव्हान देऊन जातात तरीही त्यांनी आपल्या प्रतिभावान मनाने त्याचे सुंदर चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. काव्यमय ओळी प्रवासवर्णनात उद्यृक्त केल्यामुळे प्रवासवर्णनाला लालित्य प्राप्त झाले आहे. त्याच्यात लयबध्दता येऊन प्रवासवर्णन वाचताना त्यातील वेग व जोशही जाणवत राहतो.

**आत्मपरीक्षण :**

प्रवास हा माणसाला शहाणे करून सोडतो, प्रवासामुळे मानव चतुरस्त्र बनतो, त्याचे अनुभवविश्व प्रगल्भ होते. प्रवासामुळेच न पाहिलेले जग तो पाहू शकतो. प्रवासामुळेच

आपल्या प्रदेशात व बाजूच्या इतर प्रदेशात कसे वेगळेपण आहे. आपल्यामध्ये व त्यांच्यामध्ये कोणत्या गोष्टीचे साम्य आहे याची लेखक सातत्याने पडताळणी करत असतो. त्याची संशोधकदृष्टी सतत भिरभिरत असते. प्रवासात त्या प्रवासकर्त्याला चांगल्याबरोबर वाईटही अनुभव येत राहतात. त्या परिस्थितही त्याची मानसिकता कशी होती याची तो स्वत:च चिकित्सकवृत्तीने शोध घेत असतो. आपल्याला नको त्या प्रसंगात काय अवस्था होते. याची तो स्वत:च आत्मपरीक्षण करीत असतो. उषा पाणंदीकरांनीही त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे जेवण न मिळाल्यास त्यांची गाडी बंद पडल्यावर ओढवलेला प्रसंग, दक्षिणेकडे सतत मिळणारी कॉफी, ह्यातून त्यांनी सामंजसपणा स्वत:मध्ये बाणवून घेतला. परिस्थितीपुढे कसे नमते घ्यायचे हे त्यांनी आत्मपरीक्षणातून हे गुण अवलंबीले आहेत.

**आत्मचरित्राला जवळीक साधणारे लेखन :**

प्रवासवर्णनात लेखक जेव्हा निवेदन करत असतो; तेव्हा तो नकळत आपल्या व्यक्तिमत्त्वाचीही ओळख करून देत असतो. आत्मचरित्रात जे लेखन झालेले असते. त्याच पातळीवर काही अंशानी प्रवासवर्णनात अधूनमधून असे वर्णन येत राहते. लेखकाच्या व्यक्तिगत जीवनातील घटना वर्णनात व्यक्त होणारा 'मी' हा दोन पातळ्यावरील वर्णिलेला असतो एक कलात्मक पातळीवरील 'मी' व एक व्यवहार पातळीवरील. आत्मचरित्र हे जसे लेखकाच्या व्यक्तिगत घटनाप्रसंगावर, अनुभवावर अवलंबून असते, तसेच घटना, प्रसंग प्रवासवर्णनाबरोबरच लेखकाच्या व्यक्तिमनाचेही चित्रण यात असते म्हणून आत्मचरित्राशी साम्य सांगणारे लेखन नकळत ह्यातून घडून जाते.

**लेखकाचे व्यक्तिमत्त्व :**

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरूनही त्याचा लेखनाकडील कल समजून येतो. लेखक कोणत्या परिस्थितीत जन्मला. तसेच त्याच्या घरचे लेखकाचे व्यक्तिमत्त्व समजून येते. कोणत्या कालखंडात जन्मला हेही तेवढेच महत्त्वाचे मानले पाहिजे. सौ. उषा पाणंदीकरांनी त्यांच्या 'आज इथे उद्या तिथे,' या पुस्तकाच्या मल पृष्ठावर स्वत:ची ओळख करून दिली आहे. तसेच 'मुक्काम मङ्ग्राम' या निवेदनात त्या म्हणतात, तसा साहित्याचा प्रांत मला अपरिचित नव्हता. लहानपणापासून साहित्य आणि साहित्यिकांचा सहवास मला लाभला आहे.

माझ्या साहित्य निर्मितीला माझे वडील ताता...... श्री जयवंतराव सरदेसाई, माझे पितृतुल्य स्नेही दादा... श्री. बा. द. सातोस्कर तसेच मला लेखनाचा श्रीगणेशा घालून देणारे मामा...... श्री. शांताराम हेदे यांचे मार्गदर्शन लाभले. हा वारसा मी जपून ठेवीन. एक स्त्री लेखिका म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व उठून दिसते. त्यांच्या घराची परंपरा पुढे आणण्याचा प्रयत्न त्यांनी सुंदर अशा प्रवासवर्णनाच्या माध्यमातून केला आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे बहुश्रृत, बहुअयामी तसेच त्याला वाचनाची जोड आहे. वास्तवाच्या पातळीवर उतरविण्याची ताकद त्याने साधली आहे.

**भाष्यात्मकता :**

जीवनाचे गुढ काय आहे हे बरेचजण सांगण्याचा प्रयत्न करतात. आपल्याला आलेले अनुभव व्यक्त करून त्याचे जे सार निघते, त्यातून त्यांच्या हाती जे निष्कर्ष येतात त्यावरच ते भाष्य करतात.

सौ. उषा पाणंदीकरांनीही प्रवास करत असताना निसर्गातील चमत्कार, चित्रविचित्र व्यक्ती, स्थलांचे वेगळेपण, घटना प्रसंग, शिल्पकला, वास्तुकला, चित्रकला,

लोकांची गर्दी, धांदल, गडबड यावरच त्यांनी आपल्या निरीक्षण क्षमतेच्या माध्यमातून जीवनाचा आशय व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रवासवर्णन लिहित असताना त्यांना त्या घटना प्रसंगाना सामोरे जावे लागते. त्यावेळी त्याच्यातून त्यांनी अनुभव तर घेतलाच पण त्यावर चिंतन करून त्यामागील रहस्य उलगडून दाखवण्याचा प्रयत्न आपल्या दोन्ही प्रवासवर्णनांमधून जीवनभाष्य अधूनमधून करण्याचा छानसा प्रयत्न केलेला दिसून येतो. हेच त्यांच्या प्रवास लेखनाचे विशेष म्हणून वेगवेगळ्या पैलूंचा विचार करावा लागेल. ध्यानात घ्यावे लागतील.

**समारोप :**

या प्रकरणात प्रवासवर्णनाचे विशेष पाहिले. यामध्ये आख्यायिका, दंतकथा, शिल्पवर्णन, वास्तूवर्णन, स्थलवर्णन, शहरांचे विशेष, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, समजूती, सण, उत्सव, जीवनभाष्य, लेखकाची निरीक्षणशक्ती, आत्मपरीक्षण, प्रगल्भता, लेखकाचे व्यक्तिमत्व या घटकांच्या आधारे या दोन्ही पुस्तकाचे विशेष सांगीतले आहेत. लेखिकेने प्रत्येक घटकानुसार साचेबंद व सुंदर असे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. कोणतेही प्रवासवर्णन वाचत असताना ते कंटाळवाणे वाटत नाही. थोडक्यात, समर्पक शब्दात त्यांनी वर्णन करण्याचा प्रयत्न छान केला आहे. वरील सर्व घटकांच्या आधाराने पाहिल्यास ते आपणास कळून येते.

# संदर्भ ग्रंथसूची


१. फडके भालचंद्र : मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन
प्रकरण : स्त्रियांचे अन्य लेखन प्रवासवर्णने
श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृ. २२४ ते २२६

२. सद्रे केशव म. : साहित्य देय आणि श्रेय
प्रकरण : गोमंतकीय मराठी साहित्य संकल्पना
राजहंस वितरण, पणजी. पृ. १६२, १६३.

३. सद्रे केशव म. : साहित्य देय आणि श्रेय
प्रकरण : गोमंतकीय मराठी साहित्य संकल्पना
राजहंस वितरण, पणजी. पृ. १६५.

४. कुलकर्णी वा. ल. : साहित्य शोध आणि बोध
पॉप्युलर प्रकाशन,
दुसरी आवृत्ती १९९५ / १९१६. पृ. ४८.

५. शहा मु. ब. (संपा.) : मिथक आणि मराठी साहित्य
का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन, संस्था, धुळे.
पहिली आवृत्ती. १ जानेवारी २००३. पृ. ८२

६. लोही म. ना. : साहित्य आणि कला
व्हीनस प्रकाशन, पुणे आवृत्ती पहिली.

सप्टेंबर १९६६, पृ. ७४.

७. लोही म. ना. : साहित्य आणि कला
व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली; सप्टेंबर
१९६६, पृ. ७७.

८. कुलकर्णी गो. म. (संपा.) : मराठी वाङ्.मयाचा इतिहास
कुलकर्णी व. दि.
(इ. स. १९२० ते १९५० या कालखंडातील
मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास)
खंड सहावा : भाग दुसरा
पहिली आवृत्ती : २७ मे, १९७१,
महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे. पृ. २१५.

९. कुलकर्णी गो. म. : मराठी वाङ्.मयाचा इतिहास
कुलकर्णी व. दि.
(इ.स. १९२० ते १९५० याकालखंडातील
मराठी वाङ्.मयाचा विवेचक इतिहास) खंड
सहावा; भाग दुसरा पहिली आवृत्ती २७ मे
१९९१महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. पृ. २१६.

१०. पाटील आनंद : सृजनात्मक लेखन
पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १५ मार्च
२००५,पृ. २६२.

| | | |
|---|---|---|
| ११. देशपांडे शिरीष गोपाळ | : | रूपनिरूपण<br>ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.<br>पहिली आवृत्ती २४ ऑक्टोबर २०००, पृ. ९८. |
| १२. डहाके वसंत आबाजी | : | मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.<br>पहिली आवृत्ती २००५ / १९२७, पृ. २४६. |
| १३. कऱ्हाडे सदा | : | लोकवाङ्.मय गृह प्रा. लि. मुंबई,<br>अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>(इ.स. १८१८ ते १९४७) प्रथमावृत्ती<br>एप्रिल १९८९, पृ. ८. |
| १४. कऱ्हाडे सदा | : | तत्रैव पृ. ११ |
| १५. ठाकूर रवींद्र | : | साहित्य : समीक्षा आणि संवाद<br>दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती<br>१५ ऑगस्ट १९९९. पृ. २० |
| १६. पाटणकर रा. भा. | : | सौंदर्यमिमांसा<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.<br>पहिली आवृत्ती : १९७४, दुसरी आवृत्ती :<br>१९८१, पृ. १३४, |
| १७. पाटणकर रा. भा. | : | तत्रैव पृ. १४३ |